| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५९ वा | सोमवार, दिनांक १८ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## 'नीट'पेपरफुटी प्रकरणात शिवराज मोटेगावकर सीबीआयच्या ताब्यात!:दिल्ली कोर्टात हजर करणार




**लातूर/प्रतिनिधी:!** लातूरमधील पेपरफुटीच्या धाग्यादोऱ्यांचा शोध घेण्यासाठी सीबीआयचे तब्बल २८ अधिकाऱ्यांचे जंगी पथक दाखल झाले होते. या पथकाने शिवराज मोटेगावकर यांची तब्बल ८ ते १० तास चौकशी केली.

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट'२०२६ पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धक्कादायक मोठी माहिती समोर आली. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या सीबीआयने थेट लातूरमधील नामांकित आरसीसी कोचिंग क्लासचे संचालक प्राध्यापक शिवराज मोटेगावकर यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. सीबीआयच्या या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात आणि वैद्यकीय प्रवेशाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली असून अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

**२८ अधिकाऱ्यांचे पथक आणि ८ ते १० तास चौकशी**

लातूर हे वैद्यकीय शिक्षणाच्या तयारीसाठी लातूर पॅटर्न म्हणून संपूर्ण देशात ओळखले जाते. याच लातूरमधील पेपरफुटीच्या धाग्यादोऱ्यांचा शोध घेण्यासाठी सीबीआयचे तब्बल २८ अधिकाऱ्यांचे जंगी पथक दाखल झाले होते. या पथकाने शिवराज मोटेगावकर यांची तब्बल ८ ते १० तास चौकशी केली. या चौकशीदरम्यान समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने आणि संशयास्पद बाबी आढळल्याने अखेर सीबीआयने मोटेगावकरांना ताब्यात घेतले.

मोटेगावकर यांचे नाव सीबीआयच्या रडारवर कसे आले, याचाही एक मोठा खुलासा झाला आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातून पी. व्ही. कुलकर्णी यांना या प्रकरणात अटक करण्यात आली होती. कुलकर्णी यांच्या कसून केलेल्या चौकशीतूनच शिवराज मोटेगावकर यांचं नाव समोर आले होते. त्यानुसार सीबीआयने लातूरमध्ये ही मोठी चक्रे फिरवली अन् त्यांची चौकशी केली. त्यानंतर आता त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यामुळे आता संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाल्याचे पहायला मिळते आहे.

**मोटेगावकरला दिल्ली कोर्टात हजर करणार**

लातूरमधील पेपरफुटीच्या चौकशीसाठी आलेल्या सीबीआयच्या २८ जणांच्या पथकाने त्यांची तब्बल ८ ते १० तास दीर्घ चौकशी केली होती. या खळबळजनक कारवाईनंतर आता सीबीआयची टीम मोटेगावकरला दिल्ली कोर्टात हजर करणार आहे. शिवराज मोटेगावकर यांच्यावर अत्यंत गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले असून एका पालकाने केलेल्या तक्रारीवरून हा मुख्य तपास सुरू होता.

मोटेगावकर यांच्या इन्स्टिट्यूटने घेतलेल्या मॉक टेस्ट मधील तब्बल ४२ प्रश्न थेट 'नीट'च्या मुख्य परीक्षेत जसेच्या तसे आले होते, असा धक्कादायक आरोप या पालकाने केला होता. मुख्य परीक्षेतील प्रश्न आधीच क्लासच्या टेस्टमध्ये आल्यामुळे या संपूर्ण गैरव्यवहाराचे धागेदोरे अत्यंत खोलवर गेल्याचे स्पष्ट होत असून दिल्ली कोर्टातील हजेरीनंतर या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. असे समजते.

## राजे मल्हारराव होळकर ट्रस्टचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**लातूर/प्रतिनिधी:** येथील राजे मल्हारराव होळकर ट्रस्ट तर्फे सन २०२६ करिताचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले असून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्यांचा संस्थंच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून गौरव केला जात असल्याची माहिती ट्रस्टचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. मधुकर सलगरे यांनी दिली. सन २००४ मध्ये नोंदणीकृत असलेल्या या ट्रस्टच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या सन्मानार्थ सामाजिक भूमिकेतून पुरस्कार दिले जात आहेत. यावर्षी मुंबईचे डॉ. लक्ष्मण शिवनेकर, सोलापूरचे पत्रकार तथा शरण साहित्याचे अभ्यासक चन्नवीर भद्रेश्वरमठ, डॉ. हमीद चौधरी, डॉ. हणमंतराव किणीकर, संभाजीराव सुळ, इंजिनिअर सोमनाथ बालकुंदे, बाळकृष्ण धायगुडे (सर्वजण लातूर) नांदेडचे प्रविण देशमुख, शा.औरादचे डॉ. अशोक नारनवरे, साधना शेटे आदी मान्यवर पुरस्काराचे मानकरी आहेत. रविवार २४ मे रोजी सायंकाळी ६ वाजता भालचंद्र ब्लड बँक सभागृहात खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण आणि ग्रंथ प्रकाशन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार आणि व्यवस्थापन तज्ञ सुभाष बोंद्रे हे राहणार आहेत. या कार्यक्रमास भूषवणार आहेत. या कार्यक्रमास साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## जागृती शुगरकडून कर्मचारी अधिकाऱ्यांना 'राजा शिवाजी' चित्रपट दाखवला

**लातूर/प्रतिनिधी:** अवघ्या महाराष्ट्रात अभूतपूर्व प्रतिसाद मिळालेल्या व चित्रपटाचे दिग्दर्शक असलेले सिनेअभिनेते रितेश विलासराव देशमुख यांच्या राजा शिवाजी चित्रपट तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने कर्मचारी ,अधिकारी प्रगतिशील शेतकरी यांच्यासाठी लातूरच्या पीव्हीआर सिनेमागृहात रविवारी दाखवण्यात आला या चित्रपटाला नागरिकांमधून उत्तुंग प्रतिसाद मिळाला जय भवानी जय शिवाजी या जयघोषाने चित्रपट गृह दणाणून गेले होते रितेश देशमुखच्या नावाने जयघोष करीत टाळ्यांची दाद उपस्थित नागरिकांकडून झाली. तत्पूर्वी पीव्हीआर सिनेमागृहात जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील जागृती शुगरचे संचालक दिलीप माने जागृती शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम,मीडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी यांनी चित्रपट गृहात आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले यावेळी निवासी जिल्हाधिकारी नेटके,तहसीलदार तांदळे, फॉरेस्ट ऑफिसर मुगलीकर संभाजी रेड्डी बाळासाहेब जाधव अँड चव्हाण यांच्यासह देवनी शिरूर अनंतपाळ, निलंगा तालुक्यासह जवळगा, वलांडी येथील प्रगतिशील उस उत्पादक शेतकरी ,मान्यवर तसेच जागृती शुगर चे कामगार, कर्मचारी, अधिकारी सहकुटुंब उपस्थित होते.

जय भवानी जय शिवाजी गर्जनेने प्रेक्षक भारावले

राजा शिवाजी चित्रपटात लातूरचे सुपुत्र दिग्दर्शक असलेले सिनेअभिनेते रितेशदादा विलासराव देशमुख यांच्या भूमिकेने लातूरकरांच्या डोळ्यात अक्षरशः अश्रू दिसत होतें छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी श्रद्धा भक्ती अभिमान स्पष्टपणे चित्रपटात दिसत होता उपस्थित प्रतेकांच्या मनात स्वराज्याचा इतिहास शिवरायांचे विचार अधिक दृढ होत असल्याची भावना यावेळी उपस्थित नागरिकांकडून बघावयास मिळालीफ

## खाकीतील माणुसकी | लातूर पोलिसांनी जपला जनतेचा विश्वास

## १० लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने सुरक्षितपणे मूळ मालकास केले परत

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हा पोलीस दल हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारे यंत्रणा नसून समाजातील विश्वास, प्रामाणिकपणा,नैतिकता आणि मानवतेचे प्रतीक असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित करणारी घटना लातूर शहरात घडली आहे. विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अण्णासाहेब खोडेवाड यांनी रस्त्यावर सापडलेली तब्बल १० लाख रुपये किंमतीची सोन्या-चांदीच्या दागिने असलेली बॅग अत्यंत प्रामाणिकपणे सुरक्षित ठेवून मूळ मालकाचा शोध घेऊ ते परत करण्यात आले आहे. त्यांच्या या कृतीमुळे लातूर पोलिसांची प्रतिमा अधिक उंचावली आहे. आजच्या धकाधकीच्या आणि स्वार्थी वातावरणात मोठ्या रकमेचा मौल्यवान ऐवज सापडल्यावर अनेकजण चुकीचा मार्ग स्वीकारतात. मात्र लातूर पोलिस दलातील सहायक पोलीस निरीक्षक श्री अण्णासाहेब खोडेवाड यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेचा आणि नैतिकतेचा उच्च आदर्श समाजासमोर ठेवत पोलीस म्हणजे जनतेचा खरा संरक्षक ही भावना अधिक दृढ केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि. १६ मे २०२६ रोजी रात्री ११.०० ते ११.४० वाजण्याच्या दरम्यान विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री खोडेवाड हे त्यांचे मित्रासह खाजगी वाहनाने जात होते. दरम्यान, ते सुशीलादेवी कॉलेजच्या पाठीमागील गेट परिसरात आले असता रस्त्याच्या कडेला एक काळ्या रंगाची बॅग संशयास्पदरित्या पडलेली दिसून आली.

सदर बाब संशयास्पद वाटल्याने खोडेवाड यांनी तत्काळ आपले वाहन थांबवून बॅगची पाहणी केली. बॅग उघडून पाहिली असता त्यामध्ये लहान मुलांचे कपडे, पॅम्पर्स व इतर साहित्य आढळून आले. मात्र त्याखाली सोन्या-चांदीचे मौल्यवान दागिने असल्याचे लक्षात आले. प्राथमिक पाहणीत अंदाजे ६ ते ७ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने तसेच सुमारे १ तोळा वजनाचे चांदीचे दागिने मिळून आले असून त्यांची एकूण किंमत अंदाजे १० लाख रुपये इतकी असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रथमदर्शनी ही बॅग एखाद्या कुटुंबाकडून मोटारसायकलवर प्रवास करताना नकळत रस्त्यावर पडली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. इतक्या मोठ्या किंमतीचा मुद्देमाल मिळूनही सहाय्यक पोलीस निरीक्षक खोडेवाड यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व जबाबदारीची जाणीव ठेवून सदर बॅग सुरक्षित ताब्यात घेतली आणि सदरची बाब तत्काळ वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात नमूद बॅग च्या मूळ मालकाचा शोध घेण्यात आला तेव्हा सदरील सोने, चांदी असलेली बॅग ही सौं. ज्योती प्रतीक पांचाळ प्रकाशनगर, लातूर यांची असलेले बाबत खात्री झाली आणि पुढील कायदेशीर कार्यवाही करून संबंधित व्यक्तीची योग्य ती पडताळणी व खातरजमा करून सदर मुद्देमाल मूळ मालकाच्या स्वाधीन करण्यात आला आहे. लातूर जिल्हा पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर श्री.समीरसिंह साळवे, पोलीस ठाणे विवेकानंद चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी तसेच नागरिकांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक खोडेवाड यांच्या या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष कृतीचे कौतुक केले आहे. खाकी वर्दीतही नैतिकता,संवेदनशीलता, माणुसकी आणि प्रामाणिकपणा जिवंत आहे हे या घटनेतून अधोरेखित झाले आहे. समाजामध्ये पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक बळकट करणारी ही घटना सध्या संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे.



### प्रभात किरणे

न घेता मेवा,करी जण सेवा
तया अंतरी वसे निरंतर देव
रंजले गांजलेशी जोडी नाती
कृती कार्यातून ओसंडे प्रीती

- इंजि. नागनाथ कलवले, लातूर
९७६४७ ८८२८८

### कुजबुज

- डॉ. संजय जमदाडे



राज्यात नैऋत्य मौसमी पाऊस १० जूनपर्यंत... हवामान विभाग

### चिमटा दयाचा



लातूर महानगरपालिकेचे मुलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे ! नालेसफाईकडे मात्र लक्ष दिले जात आहे !!

## 'पूर्वांचल महोत्सव माटी ९ मुंबई'मधून भारतीय संस्कृती समृद्ध करण्याचे कार्य – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** महान असलेल्या भारतीय संस्कृतीला समृद्ध करण्यासाठी महाराष्ट्र आणि पूर्वांचलने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विविध प्रदेश, भाषा आणि परंपरांमध्ये एकात्मता निर्माण करून भारतीय संस्कृती अधिक समृद्ध करण्याचे कार्य 'पूर्वांचल महोत्सव माटी ९ मुंबई' सारख्या उपक्रमातून होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सांताक्रुझ येथे कलिना कॅम्पस येथे केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय,'माटी – ए पब्लिक ट्रस्ट' व 'कलिना विद्यापीठ' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात मुख्यमंत्री बोलत होते.

कार्यक्रमाला जम्मू काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा, सांस्कृतिक मंत्री ड. आशिष शेलार, खासदार जगदंबिका पाल, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु रविंद्र कुलकर्णी, माटी महोत्सवाचे आयोजक आसिफ आझमी, मॉडर्न ग्रुप कंपनीचे ज्ञानप्रकाश सिंह उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईमध्ये मिनी पूर्वांचल वसले आहे. चार ते पाच पिढ्यांपासून पूर्वांचलातील लोक महाराष्ट्रात स्थायिक झाले असून त्यांनी पूर्वांचलच्या मातीतल्या संस्कृतीच्या आठवणी जपल्या आहेत.'एक भारत, श्रेष्ठ भारत' पाहायचा असेल तर मुंबईतील पूर्वांचल समाजाकडे पाहावे. पूर्वांचल आणि महाराष्ट्र यांचे ऐतिहासिक नाते आहे. प्रभू श्रीरामांचे पंचवटीमध्ये वास्तव्यास होते. येत्या काळात कुंभमेळ्यात पंचवटी बदललेली दिसेल, तसेच त्र्यंबकेश्वरही नव्या स्वरूपात पाहायला मिळेल. भारतीय ज्ञानपरंपरेत काशी–वाराणसीला सर्वांत मोठे स्थान आहे. अकराव्या–बाराव्या शतकात भक्तीमार्गाचा प्रसार झाला. अनेक आक्रमणांनंतरही भारतीय संस्कृती नष्ट झाली नाही, कारण ती जिवंत ठेवण्याचे काम संतांनी केले. महाराष्ट्र आणि पूर्वांचलातील संतांनी समाजाला भक्तीमार्गावर आणत संस्कृतीचे जतन केले आहे. देशातील बंडाच्या सुरुवातीच्या काळात पूर्वांचलाने मंगल पांडे यांसारखे क्रांतिकारक दिले.




पूर्वांचलमध्ये असलेले काशी ही भारताच्या संस्कृतीचे, अध्यात्माचे आणि ज्ञानपरंपरेचे सर्वात मोठे केंद्र असून गंगेच्या प्रवाहाइतकीच प्राचीन काशीची ज्ञानधारा आजही अखंडपणे वाहत आहे. भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेत काशीला अद्वितीय स्थान आहे. काशी केवळ एक धार्मिक नगरी नसून ती भारतीय ज्ञान, संस्कृती आणि परंपरेचे जिवंत प्रतीक आहे. उत्तर प्रदेशमध्ये सुरू असलेले सांस्कृतिक आणि विकासात्मक कार्य देशाच्या परंपरेला नवी दिशा देणारे आहे. समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन भारतीय संस्कृती जपण्याचे कार्य केले असून अनेक संत, विचारवंत आणि समाजपुरुषांनी आपल्या कार्यातून संस्कृती जिवंत ठेवली आहे.

पूर्वांचल या प्रदेशाने आपली सांस्कृतिक ओळख अत्यंत अभिमानाने जतन केली असून यात धोबिया, बिरहा, नौटंकी आणि चैतीसारख्या समृद्ध लोककलांचा समावेश आहे. येथील प्रसिद्ध बनारस आणि लखनऊ घराण्यांनी संगीत जगताला अमूल्य देणगी दिली आहे. कला आणि खाद्यसंस्कृतीच्या बाबतीतही पूर्वांचल आघाडीवर आहे. बाटी–चोखा, सत्तू पराठा, बनारसी पाश्यांसारखे स्वादिष्ट पदार्थ या प्रदेशाची एक वेगळी आणि दिमाखदार ओळख निर्माण करतात, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

जम्मू–काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा म्हणाले की, मुंबईकरांना पूर्वांचलच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेचा जवळून अनुभव घेण्याची सुवर्णसंधी 'माटी ९ पूर्वांचल महोत्सवा'च्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. दोन्ही प्रदेशातील संस्कृती आणि इतिहास याला खूप महत्त्व आहे. या महोत्सवातून महाराष्ट्र आणि पूर्वांचल यांचे संबंध अधिक दृढ होतील. पूर्वांचल हा केवळ भौगोलिक प्रदेश नसून समृद्ध परंपरा, संस्कार आणि जीवनमूल्यांनी परिपूर्ण अशी जीवनशैली आहे. अयोध्या, काशी, प्रयागराज आणि गोरखपूर यांसारख्या ऐतिहासिक शहरांशी जोडलेल्या पूर्वांचल प्रदेशाला स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे लोकप्रिय संस्कृतीत 'वीरांची भूमी' म्हणून ओळख मिळाली आहे. या भूमीने देशाला अनेक समाजसुधारक, विचारवंत आणि राष्ट्रभक्त दिले आहेत.

प्राचीन काळापासून वैदिक, बौद्ध आणि मुस्लिम शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणूनही पूर्वांचलची ओळख राहिली आहे. बनारस हिंदू विद्यापीठ आणि अलाहाबाद विद्यापीठासारख्या नामांकित शैक्षणिक संस्थांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत आणि बौद्धिक विकासात मोठे योगदान दिले असल्याचेही उपराज्यपाल सिन्हा यांनी नमूद केले.

महोत्सवाचे प्रमुख संयोजक आसिफ आजमी यांनी सांगितले की, या महोत्सवाने केवळ पूर्वांचलची संस्कृती सादर केली नाही, तर महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यांच्यातील सांस्कृतिक नातेसंबंध अधिक दृढ करण्याचे कार्यही केले. प्रसिद्ध लोकगायिका पद्मश्री मालिनी अवस्थी यांनी भोजपुरी आणि मराठी लोकगीते सादर केली, तर काशीच्या घाटांवरील जीवनावर आधारित कविता आणि कथा साहित्यिक यांनी सादर केल्या.

मान्यवरांच्या हस्ते पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक रामाश्रय पांडे, आयएनएचएस अश्विनीच्या बालरोग विभागाचे विभागप्रमुख कमांडर डॉ. अशोक यादव, मुंबई नॉर्थ इंडियन असोसिएशनचे कार्याध्यक्ष श्री शारदा प्रसाद सिंह, ठाकूर एज्युकेशनल ट्रस्ट आणि ठाकूर समूह कंपन्यांचे अध्यक्ष व्ही. के. सिंह, डार्विन प्लॅटफॉर्म ग्रुपचे सीएमडी अजय हरिनाथ सिंह, प्रसिद्ध अभिनेते आणि मॉडेल कुशल टंडन, बून मेटल अँड अलॉयज कॉर्पोरेशनचे प्रमोटर पार्टनर आर. जे. सिंह, लोकगायक आणि कला क्षेत्रातील मान्यवर डॉ. शैलेश श्रीवास्तव यांचा सत्कार करण्यात आला.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महागाईच्या संकटाशी लढावे लागेल

अमेरिका-ईस्त्राईल मिळून इराणशी लढत आहेत. त्यामुळे जागतिक इंधनाची समस्या निर्माण झाली आहे. जगाला इंधन पुरविणारा देशच संकटात सापडला आहे. इराणा हा लहान राष्ट्र असला तरी श्रीमंत राष्ट्र आहे. दुसरे अमेरिका महासत्ताधिश आहे. बलाढ्य राष्ट्र असताना सर्व बाबती दुबळा असलेल्या इराणशी लढत आहे. यांचे युद्ध सुरू झाल्यापासून त्रास जगाला भोगावा लागत आहे. त्यामुळे अनेक देशाने लॉकडावुन स्विकारले आहे. भारताने सावध पावले उचलली आहेत. अजून देशांतर्गत भयाण स्थिती नसली तरी चिंताजनक स्थिती आहे. अशा स्थितीत भारत अजूनही मार्ग काढत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जतनेला काटकरीने वागण्याचा सल्ला दिला आहे. तसे पाहिले तर जगात चिंताजनक स्थिती आहे. इंधनाशिवाय काहीच शक्य नाही. प्रत्येक वस्तू ही स्थलांतरीत होते. एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी घेवुन जाण्यासाठी वाहातुक आली, वाहातुकीस इंधन लागते याच्या किंमतीत वाढ झाली आहे. जनसामान्यांना वाढणाऱ्या महागाईस तोंड देणे आवघड आहे. इंधन वाढले की, वाहातुकीचे दरात वाढ होतेच, पर्यायाने सर्व वस्तुच्या दरात वाढ होते हे गणित आहे. अशा स्थितीत काय करावे तर जी समस्या निर्माण झाली याला तोंड दिले पाहिजे. लढले पाहिजे. मुळात जगणेच परवडणारे नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीचा मुकाबला करण्यात शिकले पाहिजे. जागतिक युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम जगावर होणार, त्यात भारत देश आला. भारतीयांनी या बाबत विचार करून काही पर्याय लाभतो का याचा विचार करावा, चिंतन करावे. पर्याय नसेल तर एकमेव वाढलेल्या महागाईस समोरे गेले पाहिजे. दुसरा पर्याय नाही. स्वयंपाकाचा गॅसचे संकट आले असले तरी तेवढे गडद नाही. अजून इतर देशात जी परिस्थिती ती भारतात नाही. पाकिस्तान, श्रीलंका आदि देशात परिस्थिती भयाण आहे. पाकिस्तानात पेट्रोल व स्वयंपाकच्या गॅसच्या किंमती गगणाला भिडल्या आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला संदेश दिला की, काटकसरीने वागावे, सोने खरेदी थांबवावी. त्याच प्रमाणे पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करावा. यापेक्षा वेगळे आवाहन केले नाही. या आवाहनास साथ दिली तरच संकटावर मात करता येवू शकेल. साथ द्यायची नाही असे ठरविले तर आज शेजारी राष्ट्राची स्थिती आहे तीच भारतातील नागरिकांची होवू शकेल. त्यामुळे परिस्थितीशी मुकाबला करण्याचा सक्षम असावे. कोणत्याही परिस्थितीत रडत बसू नये, यामुळे नुकसान आपलेच होणार आहे. देशात अजून परिस्थिती तितकी वाईट नाही. तरीही समस्यावर मात करण्याचा संकल्प केला पाहिजे. सध्याला भाजपाचे सरकार केंद्र स्थानी आहे. त्यांच्या जागी इतर कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी जे नरेंद्र मोदी करीत आहेत तेच केले असते. दुसरा मार्गच नाही. त्यामुळे जागतिक संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असले पाहिजे. काही झाले तरी जो पर्यंत अमेरिका व इराणशी युद्ध चालू आहे तो पर्यंत संकट मिटणार नाही. युद्ध समाप्तीनंतरही काही काळ संकट राहाणार आहे. त्यामुळे परिस्थितीचा मुकाबला करण्याचा प्रयत्न करावा. टिका करण्यात वेळ घालवू नये. जागतिक संकट असल्याने एकटा भारत कांहीही करू शकणार नाही. हे ओळखुन जो संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीला त्याचा विचार करून तसे वागण्यास काहीच हरकत नाही. विरोधक काही तरी डोक्यात विचार खुपसतील, काहीच उपयोग होणार नाही. भारताकडे तेलाच्या विहीरी किंवा गॅसचे भांडार नाही. भारताकडे अन्न धान्य पिकविण्याची क्षमता आहे. त्यामुळे विचार करून पावले उचलण्याची गरज आहे. भारताचे पंतप्रधान ईतर देशाचा दौरा करीत आहेत यामागे कारण म्हणजे इंधनाची समस्या सुटावी. वास्तविक भारतीयांनी यापुर्वीच पर्याय शोधला पाहिजे होता. सौरऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात होणे अपेक्षित होते. तो केला गेला नाही. जगच सौरऊर्जाचा उपयोग करून संकटावर मात करीत आहे. अशा स्थितीत भारतीयांनी आता एकमेव काटकसरने चालणे हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे कोणी काही ही म्हटले तरी आपल्याला जे कळते. त्याचा मार्गाने चालणे योग्य आहे. पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत तीन रूपयाची वाढ केली, ती वाढ मोठी नाही मात्र महागाई वाढविण्यात कारणीभुत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. याचा परिणाम देशभर होणार आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. युद्धजन्य स्थितीत दुसरे काय करणार आहोत. मार्ग दुसरा आहे असेही नाही. एकमेव काटकसरीने वागावे लागेल. जेवढी बचत करता येईल तेवढी करावी लागेल. इतर देशाकडून इंधन मागविणे अशक्य आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनी खुला नाही. यावर नियंत्रण आहे. एक इंधनाचे जहाज फायरींग करून बुडविल्याचे वृत्त आहे. त्यामुळे इंधनाचे मोठे संकट आहे हे मान्यच केले पाहिजे. यावर मार्ग नसल्याने इतर देशाने लॉकडावुन लावला आहे. घरीच बसून काम करणे, वाहानाचा वापर बंद करणे, प्रवास टाळणे. ही उपायोजना केली आहे. भारतीयांवर अजून मोठे संकट आले नाही. आगामी संकटावर मात करण्यासाठी प्रयत्न आता पासून सुरु केले आहेत याला जनतेनी मनापासून साथ दिली पाहिजे. सध्याला पंतप्रधांनवर टिका होत आहे. ती निरर्थक टिका आहे. दुसरा मार्ग नाही. सौरऊर्जाचा वापर, त्याला लागणारे साहित्य बसविणे याला विलंब लागणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सायकलचा वापराबरोबर पायी चालण्याची सवय लावावी लागेल. गॅसचा वापर आवश्यकता तेवढाच करावा लागेल. कारण नसताना फिरणे टाळावे लागेल. नियमाने वागण्याचे सोडून दिल्यास लॉकडावुन मध्ये आडकावे लागेल. लॉकडावुनमध्ये काय स्थिती होते याची झळ सर्वांनी भोगलीच आहे. एखादेवेळे अन्नाच तुटवडा सहन करू मात्र लॉकडावुन सहन करणार नाहीत. जीवंतबंधिस्त राहाणे परवडणारे नाही. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रजेला हाक दिली आहे. त्याला सकारात्मक परिसाद द्यावेत. सकारात्मक विचाराने वाटचाल करावी. त्याच प्रमाणे काटसरीने जीवन जगण्यास सुरवात करावी. संकटाची झळ आपोआप कमी जानवणार आहे. विर्यास्त वागाल तर वेगळीच स्थिती भोगावी लागणार आहे. वेळीच सावध होवून सकारात्मक विचाराने वाटचाल करणे योग्य ठरणारे आहे.

# 'ग्री हॅकॅथॉन'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून पुण्याची ओळख: उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' आयोजित कार्यक्रमात महिला शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे/प्रतिनिधी:** गतवर्षी जून महिन्यामध्ये आयोजित पुणे ग्री हॅकॅथॉनातील १६ नाविण्यपूर्ण उत्पादनांपैकी निवडलेल्या ४ उत्पादनांना कृषी यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही राज्य शासनामार्फत सुरु आहे. या वर्षी विविध राज्यातील सुमारे १ हजार ३०० स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून यामध्ये महाराष्ट्र राज्यातून ८६७ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. यामुळे ॲग्री हॅकॅथॉनच्या यशस्वी आयोजनातून पुणे हे विद्येच्या माहेरघरासोबतच कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून ओळखले जात आहे, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. संयुक्त राष्ट्राने यंदाचे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले असून या पार्श्वभुमीवर राज्यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये अधिकाधिक महिला शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालयाच्या सिंचननगर येथील दुसऱ्या पुणे ग्री हॅकॅथॉन-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, ग्रीनरोड इनोवेशन इस्रायलचे अध्यक्ष शफरीर गोडेल, जुरी कमिटी सह अध्यक्ष प्रा. डॉ. के. ई. लवांडे, डॉ. राजाराम देशमुख, सुपर जुरी तथा महाराष्ट्र कृषी तंत्रज्ञ संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. उमाकांत दांगट आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रात देशात आघाडीवर असलेलं राज्य असून ऊस, साखर, भाजीपाला उत्पादन आणि फलोत्पादनात तसेच कृषी निर्यातीतदेखील अग्रेसर आहे. कृषी क्षेत्रासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण' (एआय पॉलिसी) जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एआय पॉलिसीकरीता सन २०२५ च्या अर्थसंकल्पात यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवली होती. तसेच त्यांच्या प्रयत्नामुळेच बारामती येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कृत्रिम बुद्धीमत्ता केंद्र उभारण्यात आले आहे.

त्या पुढे म्हणाल्या, राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेबरोबरच कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषी समृद्धी योजना जाहीर केली. त्यासाठी अर्थसंकल्पात २ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यावर्षीच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना खतांची अडचण येणार नाही याची काळजी घेतली जात आहे. हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार यावर्षी पाऊस कमी झाल्यास उद्भवणाऱ्या परिस्थितीत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील.

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून पुणे ग्री हॅकॅथॉनचे आयोजन**

हॅकॅथॉन ही संकल्पना प्रामुख्यानं माहिती व तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रात वापरली जात होती, कृषी क्षेत्रातील विविध नवनवीन उपाययोजना पुढे येऊन कृषी विकासात त्याचा फायदा होईल, याच धर्तीवर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून ॲग्री हॅकॅथॉनचे आयोजन करण्याची संकल्पना पुढे आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या संकल्पनेला भक्कम पाठिंबा दिला. गतवर्षी जून महिन्यामध्ये पुणे ॲग्री हॅकॅथॉनचे प्रथमच आयोजन करण्यात आले आणि ते यशस्वी देखील झाले. या हॅकॅथॉनमध्ये १६ नाविन्यपूर्ण उत्पादनांची निवड करण्यात आली आणि विजेत्यांना मोठी पारितोषिकंही देण्यात आली. आजच्या घडीला १६ पैकी १२ उत्पादनांना कृषी विद्यापिठांचे प्रमाणीकरण प्राप्त झाले आहे. यशस्वी नवतंत्रज्ञांन कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यासारख्या संस्था सहकार्य करीत आहेत. निवडलेल्या उत्पादनांपैकी ४ उत्पादनांना कृषी, यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**यंदाच्या ग्री हॅकॅथॉनमध्ये महाराष्ट्र राज्यातील ८६७ स्पर्धक सहभागी**

यावर्षीच्या हॅकॅथॉन स्पर्धेसाठी ९ विषयांचा समावेश आहे. यावर्षी विविध राज्यातील सुमारे १ हजार ३०० स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून महाराष्ट्र राज्यातून ८६७ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. सलग दुसऱ्या वर्षी या पुणे ग्री हॅकॅथॉनचं यशस्वी आयोजन केल्याबद्दल राज्याचा कृषी विभाग, जिल्हा प्रशासनाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. हॅकॅथॉनमध्ये सहभागी उत्पादन, संशोधन, प्रयोग या शेतकऱ्यांकरिता उपयुक्त असून याचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले.

**कृषी क्षेत्रात अडी-अडचणींवर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व नवकल्पनांचा वापर करण्याचे आवाहन**

बदलत्या काळानुरुप शेतकऱ्यांसमोर अनियमित पाऊस, पाण्याची टंचाई, मातीची निकृष्टता, बाजारपेठेतील अस्थिरता, हवामान बदल आणि वाढता उत्पादन खर्च यासारखी विविध आव्हाने आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्याकरिता कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाची जोड, नवकल्पना आणि युवकांच्या उर्जेचा योग्य वापर खरा उपाय ठरेल. ग्री हॅकॅथॉन मध्ये सहभागी युवक, अभियंते, डेटा साइंटिस्ट, कृषी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि स्टार्टअप उद्योजक कृषी क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी आपली बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलता वापरतील. आपल्या उपायोजना, नवकल्पना शेतकऱ्यांच्या शेतात, मोबाईल ॲपमध्ये, ड्रोनमध्ये, सेन्सर्समध्ये आणि एआय आधारित प्लॅटफॉर्ममध्ये प्रत्यक्षात



वापरले जातील. कृषी विभागानं या हॅकॅथॉनसाठी जे प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन दिले आहेत, त्याबद्दल कृषी विभागाचे आणि सर्व आयोजकांचे अभिनंदन करुन त्या म्हणाल्या, आपल्या सर्वांच्या प्रयत्नांनी महाराष्ट्र हे कृषी नवकल्पनांचे केंद्र बनेल, असा विश्वास श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

डॉ. लवांडे म्हणाले, कृषी क्षेत्रातील अडीअडचणी नाविन्यपूर्ण कल्पनेच्या माध्यमातून सोडविण्याच्या दृष्टीने सन २०२५ पासून 'पुणे ग्री हॅकॅथॉन' चे आयोजन करण्यात येत आहे. पुणे ग्री हॅकॅथॉन-२०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी 'आयमॅट' संस्थेच्यावतीने करण्यात आली. शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश, हॅकॅथॉनमध्ये कृषी विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा नवकल्पांना समावेश, विद्यापीठामध्ये इन्क्युबेशन केंद्र उभारणी आदी विषयांच्या अनुषंगाने श्री. लवांडे यांनी सूचना केल्या.

श्री. डुडी म्हणाले, नवनवीन तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना उपयोग व्हावा, त्याच्या उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने गतवर्षीपासून 'पुणे ग्री हॅकॅथॉन' चे आयोजन करण्यात येत आहे. पहिल्या पुणे ग्री हॅकॅथॉनमध्ये १६ नाविन्यपूर्ण उत्पादनाची निवड करण्यात आली असून या सर्व उत्पादनांची तपासणी करण्यासाठी विद्यापीठ आणि कृषी विभागामार्फत करण्यात आली. यशस्वी उत्पादन शेतापर्यंत पोहचविण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने लवकरच शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे.

पुणे ग्री हॅकॅथॉन-२०२६ करिता गतवर्षीच्या तुलनेत अडीचपट अर्ज प्राप्त आहेत. यावरुन या स्पर्धेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे. अर्जांची तज्ज्ञामार्फत तपासणी करुन १५ उत्पादनांची निवड करण्यात आली आहे, त्यापैकी जवळपास १२३ स्टॉल लावण्यात आले आहेत. यामध्ये सहभागी उत्पादकांना पारितोषिके देण्यात येणार असून त्यांना सहकार्य करण्यात येणार आहे.

यावर्षीच्या स्पर्धेत मृदा आरोग्य आणि व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन आणि ऑटोमेशन, शेती यांत्रिकीकरण (एआय आणि रोबोटिक्स), कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी, अक्षय ऊर्जा आणि कृषी-कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कीड व्यवस्थापन, हवामान-अनुकूल आणि डिजिटल शेती, प्रभावी कृषी प्रशासनासाठी एआय, तंत्रज्ञान आधारित हस्तक्षेप प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पीक नुकसानीचे मूल्यांकन आणि भाकितासाठी एआय, तंत्रज्ञान, साधने या ९ विषयाशी निगडित आहे. या हॅकेथॉनचा कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी, शेतकरी, नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

**हॅकेथॉनच्या उद्घाटनानंतर मान्यवरांनी स्टॉलला भेट देऊन उत्पादन, संशोधनाची माहिती घेतली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय सावंत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, आत्मा प्रकल्प संचालक सूरज मडके, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲंड ॲग्रीकल्चरचे महासंचालक, प्रशांत गिरबाने, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स कमिटी सदस्य चेतन देदिया, बँक ऑफ महाराष्ट्रच्या उप विभागीय व्यवस्थापक वर्षा थूल, कृषी महाविद्यालय सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, विद्यार्थी, स्टार्टअप, संशोधक, शेतकरी उपस्थित होते.

# चटकदार 'पिझ्झा' नेमका कुठून आला?

'पिझ्झा' हा आज जगातील सर्वात लोकप्रिय पदार्थांपैकी एक आहे. एका साध्या पावापासून सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक स्तरावर अब्जावधी डॉलर्सच्या उद्योगात रूपांतरित झाला आहे. पिझ्झाची संकल्पना ही अत्यंत प्राचीन आहे. इजिप्शियन, ग्रीक आणि रोमन संस्कृतींमध्ये पीठाच्या चपट्या भाकर्यांवर (पाव) तेल, औषधी वनस्पती आणि खजूर लावून खाण्याची पद्धत होती.

प्राचीन ग्रीक लोक 'प्लाकूस' नावाचा पदार्थ खात असत, ज्यावर चीज, लसूण आणि कांदा असे घटक असायचे. सहाव्या शतकात पर्शियन सैनिक त्यांच्या ढालीवर फ्लॅटब्रेड म्हणजेच पाव भाजून त्यावर चीज आणि खजूर टाकून खात असत. आज आपण जो पिझ्झा पाहतो, त्याचे खरे श्रेय इटलीतील नेपल्स शहराला जाते. १८ व्या शतकात आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीला नेपल्स हे एक गजबजलेले बंदर होते. नेपल्समधील कष्टकरी कामगारांना स्वस्त आणि लवकर खाता येईल, अशा अन्नाची गरज होती. त्यामुळे रस्त्यावरील विक्रेते फ्लॅटब्रेडवर टोमॅटो, लसूण, तेल आणि चीज घालून विकू लागले.

सुरुवातीला युरोपमध्ये टोमॅटोला विषारी मानले जात असे. मात्र, नेपल्समधील गरिबांनी जेव्हा याचा वापर पिझ्झावर करण्यास सुरुवात केली, तेव्हा पिझ्झाला आधुनिक चव मिळाली. पिझ्झाच्या इतिहासातील सर्वात प्रसिद्ध घटना १८८९ मध्ये घडली. इटलीचे राजा उमबेर्तो प्रथम आणि राणी मार्गेरिटा यांनी नेपल्सला भेट दिली. राणीला स्थानिक पदार्थ चाखायचा होता म्हणून प्रसिद्ध शेफ राफाल एस्पोसिटो यांनी त्यांच्यासाठी तीन प्रकारचे पिझ्झा बनवले.

राणीला तो पिझ्झा सर्वात जास्त आवडला ज्यामध्ये इटलीच्या ध्वजाचे तीन रंग होते : लाल (टोमॅटो), पांढरा (मोझारेला चीज) आणि हिरवा (तुळस किंवा बेसील). राणीच्या सन्मानार्थ या पिझ्झाला 'पिझ्झा मार्गेरिटा' असे नाव देण्यात आले. १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला इटालियन लोक मोठ्या संख्येने अमेरिकेत स्थलांतरित झाले. त्यांनी आपल्यासोबत पिझ्झाची कलाही नेली. १९०५ मध्ये न्यूयॉर्कमध्ये 'लोंबार्डीज' हे अमेरिकेतील पहिले अधिकृत पिझ्झेरिया सुरू झाले.




# नात्यांचे तीन मुखवटे: जगण्याची आणि जपण्याची कला

नात्यांची वीण टिकवण्यासाठी कधी डोळस अंधत्व, कधी सहनशील बहिरेपणा
आणि कधी संयमी मौन स्वीकारावं लागतं. समोरच्याच्या उणिवांकडे दुर्लक्ष, कटू शब्दांना
माफ करणं आणि योग्य वेळी शांत राहणं हीच नाती जपण्याची खरी कला आहे.
प्रेमासाठी केलेला हा अदृश्य अभिनयच नात्यांना दीर्घायुष्य देतो.

नजरेवरती पडदा टाकू, उणिवांचा हा नजारा,
चूक तुझी ही भासे मजला, देखणा तुझा नखरा।
डोळस सोडून अंधार स्वीकारू, प्रेमाच्या या रीतीने,
संसाराची वीण सांधू, समजूतदार हसण्याने।। १ ।।
तिखट बोलांची धार येता, कानांवरती आवरणे,
भाषण तुझे गाणे वाटे, लयीत तुजला सावरणे।
क्षमेचा हा कवच पांघरू, गर्वाची ही सोडून ढाल,
शांततेच्या वाऱ्याने मग, नात्याची ही राहे खुशाल।। २ ।।
शब्दांची ही शस्त्रे आवरू, ओठांवरती शांतता,
मौनदीप हा मनात लावू, संपवून ही कटुता।
कसरत ही अभिनयाची, प्रेमासाठी केलेली,
नात्यांची ही वेल सदा, शब्दावाचून बहरलेली।। ३ ।।

मानवी आयुष्य म्हणजे नात्यांचा एक सुंदर पण नाजूक कोलाज. ही नाती कधी
रेशमी धाग्यासारखी मऊ असतात, तर कधी काचेसारखी संवेदनशील. नात्यांचं हे
विणकाम टिकवून ठेवणं ही एक मोठी जीवनकला आहे. ही जीवनकला साध्य
करण्यासाठी आपल्या मुद्रेवर तीन मुखवटे परीधान करावे लागतील. हे मुखवटे म्हणजेच
आंधळा, बहिरा आणि मुका होता आले पाहीजे. हा केवळ सुवीचार किंवा केवळ उपदेश
नसून नातेसंबंधांच्या मंदिरातील 'मौनदीप' आहेत. नाती टिकवण्यासाठी एकाच व्यक्तीला
अनेकदा हे तीन मुखवटे एकाच वेळी परिधान करावे लागतात. ही कला ज्याला जमली
तो खरी नाती जपू आणि वाढवू शकतो.

अर्थात आपल्या नात्यात पहिला मुखवटा येतो तो म्हणजे 'आंधळेपणा'. याचा अर्थ
असा नाही की, धृतराष्ट्र सारख अंधत्व स्विकारायच तर डोळस अंधत्व असल पाहीजे.



आपल्याला समोरच्याच्या चुका दिसत असतात, पण, कधी कधी डोळे असूनही काही
गोष्टींकडे दुर्लक्ष करणं, म्हणजेच प्रेमाची पट्टी डोळ्यावर बांधणं गरजेचं असतं.
समोरच्याच्या उणिवांकडे काणाडोळा करून त्याच्यातील चांगुलपणा शोधणं, हा
आंधळेपणा अगतिकतेचा नसून तो समजूतदारपणाचा असतो. सर्व काही पाहणारी नजर
नाती वाचवू शकत नाही; कधी कधी मुद्दाम मिटलेले डोळेच घर आणि मनं टिकवतात.

दुसरा मुखवटा आहे 'बहिरेपणा'. नात्यांच्या प्रवासात कधी कधी कटू शब्दांचे बाण
सुटतात, टीकांचे वादळ येते. अशा वेळी अहंकाराला बाजूला सारून 'क्षमेची शाल' पांघरून
बहिरे व्हावे लागते. टोचणारे शब्द जर मनाच्या गाभाऱ्यात साठवून ठेवले, तर नात्याचा
ओलावा आटायला वेळ लागत नाही. ऐकूनही न ऐकल्यासारखं करणं ही सहनशीलतेची
सर्वोच्च पायरी आहे. यामुळे नात्यातील संवाद जरी थांबला, तरी विसंवाद टाळता येतो.

तिसरा आणि अत्यंत कठीण मुखवटा म्हणजे 'मुके होणं'. जेव्हा अंतर्मनात
शब्दांची धार तीव्र असते, उत्तर देण्याची पूर्ण क्षमता असते, तेव्हा ओठांवर 'मौनाचा दीप'
लावणं हेच संयमाचं लक्षण आहे. मौन म्हणजे केवळ शांत बसणे नव्हे, तर नात्यांवर
चढवलेलं ते एक सुगंधी चंदन आहे. शब्दांनी झालेली जखम भरून येत नाही, पण योग्य
वेळी धरलेलं मौन नात्याचं तुटणारं घर पुन्हा सांधू शकतं.

एकाच माणसाला हे तीन चेहरे सांभाळताना मोठी कसरत करावी लागते. हे
मुखवटे म्हणजे ढोंगीपणा नसून तो एक 'अदृश्य अभिनय' आहे, जो केवळ प्रेमापोटी
केला जातो. नात्यातलं घर हे विटा-मातीपेक्षा शब्दांच्या संयमावर आणि शांततेवर उभं
असतं. शेवटी, नाती शब्दांनी नाही, तर अनेकदा न बोललेल्या मौनानेच अधिक काळ
टिकतात आणि बहरतात. या तीन अवस्थांतूनच नात्यांचं नाजूक विणकाम अखंड आणि
अभेद्य राहते. तर मग असे मुखवटे घालून तर पहा



राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील

## उपदेशकथा: श्रद्धेचे फळ

सुप्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान 'मदर इंडिया'ची निर्मिती करीत होते तेव्हा त्यांच्यावर बऱ्याच संकटाचा वर्षाव झाला. त्यांची स्वत:ची तब्येत बिघडली. चित्रपटाचं बजेटही वाढलं. वितरकांशी पूर्वी त्यांनी कधी लेखी करार केले नव्हते. केवळ विश्वासावर व्यवहार केले होते. चित्रपटाची किंमत वाढवली नव्हती पण खर्चाचं पारडं जड झालेलं होतं. मेहबूब खाननं पैशाच्या पूर्ततेसाठी आपली सर्व मालमत्ता गहाण टाकली. स्टुडिओ तारण ठेवून पैसे उभे केले आणि निष्ठापूर्वक चित्रपटाचं काम पूर्ण केलं. मेहबूब खान यांची कामावर आणि परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा होती. ठरल्याप्रमाणे मेहबूब खान चित्रपटाच्या निगेटिव्हज घेऊन




पवित्र मक्केच्या यात्रेला गेले व तेथून लंडनला जाऊन चित्रपटावरच्या रासायनिक प्रक्रिया पूर्ण केल्या. ढासळणाऱ्या तब्येतीकडे आणि गुंतवलेल्या पैशाकडे दुर्लक्ष करून श्रद्धेने काम पूर्ण केलं. १९५८ मध्ये 'मदर इंडिया' प्रदर्शित झाला आणि एकट्या महाराष्ट्राला पंचवीस लाख मनोरंजन करपरतीमुळं मिळाले. महाराष्ट्र सरकारनं करमणूक कर माफ केला होता आणि उत्पन्नाचे विक्रम मोडले गेले होते.

***

**कथा उपदेश : प्रत्यक्ष कामावर निष्ठा आणि परमेश्वरावर श्रद्धा असेल तर यश नक्की मिळते.**

## नेहमी आनंदी रहा - सुधांशु महाराज



आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही. विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी खालील सोप्या टिप्स

**पाळा:**नियमित ध्यान आणि योगासने: दररोज १० ते १५ मिनिटे ध्यान किंवा प्राणायाम केल्याने मन शांत होते आणि एकाग्रता वाढते.स्क्रीन टाईम कमी करा: मोबाईलचा अतिरिक्त वापर आणि सोशल मीडियाचा अतिरेक टाळा. यामुळे मानसिक ताण कमी होण्यास मदत होते.शारीरिक **व्यायाम:** दररोज किमान २० ते ३० मिनिटे चालणे किंवा व्यायाम करणे मेंदूमध्ये आनंदी हार्मोन्स (सेरोटोनिन) तयार करतो.पुरेशी झोप: रोज ७ ते ८ तासांची गाढ झोप घ्या. यामुळे मेंदूला विश्रांती मिळते आणि स्मरणशक्ती सुधारते.छंदांना वेळ द्या: वाचन, चित्रकला, किंवा संगीत ऐकणे यांसारख्या आवडत्या गोष्टी केल्याने तणाव दूर होतो आणि मन प्रसन्न राहते.नाही म्हणायला शिका: तुमच्या क्षमतेपेक्षा जास्त जबाबदाऱ्या स्वत:वर घेऊ नका. यामुळे अनावश्यक ताण टळतो.



## मनोविकासाचे ध्यास पर्व



**समाज हा मूठभर चांगल्या लोकांमुळे चालत असतो. समाजातली सकारात्मकता, आशावाद, अस्सलपणा, सामंजस्य, कृतज्ञता टिकवून ठेवणारी आनंद नाडकर्णींसारखी माणसं जाऊ नयेत असं वाटतं. त्यांच्यातला अखंड ऊर्जेचा झरा प्रेरणा देणारा असतो. आजच्या विवेकभ्रष्ट समाजाला शहाणी असणारी माणसं हवी आहेत.**

''सामाजिक कार्य सुरू करणं सोपं असतं पण ते जिवंत गतिमान, रसरशीत कसं ठेवायचं? कामातला जीवनरस कायम ठेवण्यासाठी व्यक्तिगत साधना आणि सामाजिक कार्य यातील भेद मिटवून टाकावा लागेल. आपण या दोन गोष्टी भिन्न समजतो. त्यामुळे व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक कार्य यात ओढाताण होते. व्यक्तिगत अध्यात्मिक चिंतन आणि सामाजिक कर्मयोग हे दोन्ही एकच मानले पाहिजे. म्हणजे आपली कार्ये सदैव प्राणवान राहतील. चिंतन ही सुद्धा सेवा आहे आणि सेवेमध्ये चिंतन केले पाहिजे.'' - आचार्य विनोबा भावे.

'शहाण्यांचा सायकिॲट्रिस्ट' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत वरिल परिच्छेद डॉ. आनंद नाडकर्णी यांनी उद्धृत केला आहे. त्यांनी आजवर केलेल्या कार्यामागची वैचारिक बैठक या परिच्छेदातून दिसून येते. 'सेवा आणि चिंतन यांची सांगड घालण्याचा माझा एक प्रयत्न म्हणजे हे पुस्तक,' असं ते म्हणतात. पण हा प्रयत्न डॉ. नाडकर्णी यांनी आयुष्यभर केला, आणि त्यात ते कमालीचे यशस्वी झाले असं आज ठामपणे म्हणता येतं. आज डॉ. आनंद नाडकर्णी अनंताच्या प्रवासाला निघून गेले. आनंदी वृत्ती कायम रक्तात असणारा हा आनंदयात्री, आपल्यासाठी,आपल्या प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी कायम असणार आहे, असंच वाटत होतं; नव्हे तशी खात्रीच होती. त्यांच्याशी संबंधित प्रत्येकाला आज निराधार, पोरकं वाटत असेल. हजारो लोकांना जगण्याची उमेद देणार्या डॉक्टर नाडकर्णींचं अकाली जाणं हे न पटण्यासारखं आहे. अनेक व्यक्ती आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे येत असतात. अनेकांमुळे आपण प्रभावित होतो, अनेकांमुळे जगण्याला दिशा मिळते. हे सगळं असूनही कायमस्वरूपी आपल्यासोबत असणार्या व्यक्तींची जातकुळीच वेगळी असते. महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांना जसं मराठी वाचकांच्या मनातून बाहेर काढता येत नाही, तसाच डॉ. आनंद नाडकर्णींबद्दल माझा अनुभव आहे.

'आपल्यासहित जे चालतं ते साहित्य' अशी विनोबा भावे यांनी साहित्याची व्याख्या केली आहे. नाडकर्णी सरांचं साहित्य आणि व्याख्यानं या व्याख्येची पुष्टी करणारं आहे. माझी आणि त्यांची प्रत्यक्ष ओळख होती का? तर नाही. मी कधी तरी त्यांना भेटले होते का? तर नाही. कधी तरी त्यांच्याशी पत्रव्यवहार किंवा फोनवर संवाद झाला होता का? अजिबात नाही, पण त्यांच्या पुस्तकांमधून, व्याख्यानांमधून माझ्या मनावर, मेंदूवर, जडणघडणीत कायमस्वरुपी परिणाम करणारी, माझ्या सोबत असल्याची प्रकर्षाने जाणीव देणारी ही व्यक्ती आहे, हे मात्र खरंय. हाच माझा आणि त्यांच्यातील दुवा. वैयक्तिक ओळख नसतानाही आपली जवळची व्यक्ती गमावल्याची वेदना आज वेढून बसली आहे.

इथे पुलंचा संदर्भ आठवण्याचं कारण हे, की महात्मा गांधी, विनोबा भावे, रविंद्रनाथ टागोर, स्वा. सावरकर, साने गुरुजी इत्यादी विभूतींचं मोठेपण पुलंच्या शब्दातून सहज उमजत गेलं तर त्यांच्या जगण्यातलं उन्नत मानसशास्त्र आणि अध्यात्म डॉ. नाडकर्णींनी अलगद उलगडून सांगितलं - ते ही अगदी सोप्या भाषेत. मानस विज्ञानाचे अनेक शास्त्रीय सिद्धांत अध्यात्माला सहज जोडण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. मानसशास्त्रीय विवेचन आणि अध्यात्म यांची बेमालूम सांगड घालून आधुनिक प्रवचन करणारा हा महर्षी होता असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. मनोविकार होऊच नये म्हणून मनोविकास व्हायला हवा, हा त्यांचा अट्टाहास होता.आणि हे व्रत त्यांनी कायम पाळलं. एवढंच नाही तर या व्रतात अनेक कार्यकर्त्यांची फौज निर्माण केली. एका सायकिॲट्रिस्टची डायरी, शहाण्यांचा सायकिॲट्रिस्ट, स्वभाव विभाव, विषादयोग, गध्देपंचविशी, कर्मधर्मसंयोग, वैद्यकसत्ता, मनोगती, हे ही दिवस जातील या पुस्तकांनी मला खूप काही शिकवलं. केवळ शिकवलंच नाही तर ती शिकवण आजतागायत सोबत करते आहे. याशिवाय डॉ. नाडकर्णी अधिक जवळ आले ते कोविडकाळात. सायंकाळची संवादमाला, माईंड फीस्ट, कळण्याचे दिवस, करण्याचे दिवस या व्याख्यानमालेतून त्यांचा अधिक चांगला परिचय झाला. कोविडकाळातील ताण विवेकबुद्धीने कसा हाताळायचा, अशा परिस्थितीत सकारात्मकता आणि आनंद कसा टिकवून ठेवायचा याचं उत्तम विवेचन त्यांनी केलं. त्यांच्यातील अंगभूत सामंजस्य, व्यवहारातील यथोचित उदाहरणं, त्यावर विनोदाचा तडका आणि समाजाला नवीन दृष्टिकोन देण्याची तळमळ... या सगळ्यांचं मिश्रण त्यांच्या वाचिक शब्दांना अस्सल रूप देई. याशिवाय त्यांच्या व्याख्यानात संत साहित्याचे दाखले, ज्ञानेश्वरांच्या ओव्या, तुकारामांचे अभंग, भगवद्गीतेचे संदर्भ, विवेकानंद, महात्मा गांधी, ओशो, विनोबा भावे, सर्वपल्ली राधाकृष्णन अशा विद्वानांच्या वचनांचे संदर्भ असल्याने त्या व्याख्यानांची उंची कमालीची वाढलेली असे. कोविडकाळातील तसंच इतरही त्यांच्या अनेक व्याख्यानांमध्ये निराशेतून बाहेर काढण्याची, ऊर्जा प्रदान करण्याची आणि मनोविकास घडवून आणण्याची जबरदस्त क्षमता होती. वेद उपनिषद, कुराण, बायबल यांचा प्रगाढ व्यासंग त्यांच्या व्याख्यानातून जाणवत असे.

वाचक आणि श्रोत्याला समृध्द करणारं त्यांचं साहित्य वारंवार वाचनाला प्रवृत्त करणारं आहे. कोविडकाळातील त्यांची व्याख्यानं आजही मनाला उभारी देतात. महत्वाचं म्हणजे ही व्याख्यानं ऐकताना या सखोल विद्वत्तेच्या वर, सामाजिक बांधिलकीच्या वर दशांगुळे पुरुन उरणारा एक मिश्किल, पारदर्शक, डोळ्यात लहान लेकराचं कुतूहल असणारा एक निर्व्याज, सच्चा माणूस बघताना विलक्षण अनुभव येत असे.

उत्क्रांतीमध्ये मेंदूत होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बदल अपरिहार्य असतात. पण स्वतः माणूसदेखील स्वप्रयत्नाने आपल्या मेंदूचा योग्य विकास करू शकतो मेंदूचं सामर्थ्य वाढवू शकतो हे आजच्या तांत्रिक भाषेत डॉक्टर नाडकर्णी खूप सोपं करून सांगायचे. हे सांगताना 'आधी केले, मग सांगितले' याची प्रचिती यायची. उन्नत मेंदूचे विचार, भावना आणि कृतीद्वारे कसे पोषण होऊ शकते, हे त्यांना बघूनच पटत असे. आस्था, करुणा, तन्मयता, कृतज्ञता त्याग सहिष्णुता, निर्मलता, कैवल्य या उन्नत मनोवृत्तींचे ते स्वतः एक जिवंत उदाहरण होते.

आज डॉ. आनंद नाडकर्णी आपल्यात नाहीत. या हरहुन्नरी आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाबद्दल अनेक विद्वान, अभ्यासू व्यक्ती लिहितील आणि भावना व्यक्त करतील. त्यांच्या कार्याचे, त्यांच्यातील विविध पैलूंचे वर्णन करतील. अशा वेळी माझ्यासारख्या अतिसामान्य व्यक्तीने त्यांच्यावर चार ओळी लिहिण्याचे काय प्रयोजन? त्यांच्यावर लिहिण्याची माझी पात्रता नाही. एक अभ्यासू, विद्वान, सामाजिक भान असलेला मानसविकार तज्ञ हा केवळ साहित्यातून सामान्य माणसाच्या जडणघडणीत चांगला बदल घडवून आणू शकतो हे मला अधोरेखित करायचे आहे, जेणेकरून हे स्मरण कुणा गरजू व्यक्तीला डॉ. नाडकर्णी यांच्या साहित्य, व्याख्याने जाणून घेण्याची प्रेरणा देईल. हे लेखन व्यक्तिगत अनुभवापुरतं मर्यादित आहे, तसंच त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एकच मार्ग माझ्या आवाक्यातला आहे.

समाज हा मूठभर चांगल्या लोकांमुळे चालत असतो. समाजातली सकारात्मकता, आशावाद, अस्सलपणा, सामंजस्य, कृतज्ञता टिकवून ठेवणारी आनंद नाडकर्णींसारखी माणसं जाऊ नयेत असं वाटतं. त्यांचं असणं हे निरोगी समाजासाठी खूप आवश्यक, आश्वासक आणि दिलासा देणारं असतं. त्यांच्यातला अखंड ऊर्जेचा झरा प्रेरणा देणारा असतो. आजच्या विवेकभ्रष्ट समाजाला शहाणी असणारी माणसं हवी आहेत. आनंद मरा नही, आनंद कभी मरते नही. हे कितीही खरं असलं तरी, डॉ नाडकर्णी सर, तुम्ही अजून रहायला हवं होतं.

**- डॉ. साधना कुलकर्णी**

### १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉक्टर लग्नाला दोन महिने झाले, पण शारीरिक संबंधात मी फारच कमी पडतो. मला तिचं समाधान करता येत नाही. मी फार आधीच संपतो. यामुळे मला आता रोज रात्री घरी जाण्याचीच भीती वाटते. आता तर माझ्यातलं पौरुषत्व संपल्यासारखं वाटतं.

### २ Joke विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्म लो, नि ते वडील बनले ना स!

### ३ Message संदेश




Har subah teri duniya me roshni kar de
Rab tere gum ko teri khushi kar de,
Jab bhi tootne lage teri sansein....Khuda tujme shamil meri zindagi kar de.

### ४ Thought सुविचार

उद्योग हेच माणसाचे लक्षण आहे.

- संस्कृत सुभाषित




**संस्कृत सुभाषित**

**दुर्जन: प्रियवादीच नैतद् विश्वासकारणम् । मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषम् ।।**

अर्थ : दुष्ट माणूस गोड बोलत असला तरी त्याच्यावर विश्वास ठेवू नये. कारण त्याच्यावर जिभेवर मध असला तरी हृदयात मात्र भयंकर विष असते.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

### उभे शब्द

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक
१५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

### आडवे उत्तरे

१.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

### उभे उत्तरे

१.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी




# अश्लील सादरीकरणावर नियंत्रणासाठी सेन्सॉर बोर्ड हवे

## लावणी कलावंतांची मागणी; मुख्यमंत्र्यांना निवेदन





पुणे : लोककला आणि लावणीचे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. ते पारंपारिक पद्धती-नेच सादर झाले पाहिजेत. डीजे लावून अश्लील कार्यक्रम करणार्यांवर निर्बंध असायला हवेत, या सर्व प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारच्या वतीने त्वरित स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड समितीची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी रविवारी लावणी कलावंतांनी केली आहे.

सध्या लावणीच्या नावाखाली डीजे नृत्य, रंगमंच सादरीकरणाच्या नावाने अश्लील सादरीकरणे होत आहेत. यावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने स्वतंत्र नियामक मंडळ स्थापन करण्यात यावे, यावर चर्चेसाठी बैठक आयोजित केली होती. या बैठकीला लावणी कलावंत, तमाशा कलावंत, कार्यक्रमांचे निर्माते आदी सहभाग झाले. बैठकीचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस चित्रपट आणि सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी केले होते. प्रसिद्ध लावणी कलाकार सुरेखा पुणेकर, ज्येष्ठ कलाकार लावणी मंगला बनसोडे, बरखा जळगावकर, अप्सरा जळगावकर, संगीत बारी (कला केंद्र) असोसिएशनचे अध्यक्ष अश-ोक जाधव, अखिल भारतीय मराठी तमाशा परिषदेचे प्रदेश सचिव मोहित नारायणगावकर, लावणी कलाकार राजश्री काळे, वनमाला बागुल, अखिल महाराष्ट्र लोककलावंत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नारायण जावळेकर, कार्याध्यक्ष शिवाजी जावळेकर आदी उपस्थित होते. ज्येष्ठ लावणी कलावंत मंगला बनसोडे म्हणाल्या, महाराष्ट्राची लोककला असलेल्या लावणी आणि तमाशाला अनेक वर्षाची परंपरा आहे. मात्र, मध्यंतरी डीजे शो चालू झाले आहेत. त्यामुळे पारंपारिक लोककलेवर परिणाम होत आहे. राज्य सरकारने याबाबतीत सेन्सॉर बोर्ड समिती तयार करून महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेला नवसंजीवनी प्राप्त करून द्यावी.

लावणी आमच्यासाठी केवळ कला  लावणी आणि तमाशा ही आमच्यासाठी केवळ कला नाही, तर आमच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेली परंपरा, संस्कृती आणि उदरनिर्वाहाचे साधन आहे. आम्ही या कलेला नेहमीच सन्मानाने जपले आहे. मात्र, आज काही ठिकाणी डीजेच्या तालावर आणि व्यावसायिक स्पर्धेतून लावणीचे मूळ स्वरूप बदलताना दिसत आहे. आम्हाला आधुनिकतेला विरोध नाही, पण परंपरेचा आत्मा जपला गेला पाहिजे. कलाकारांना प्रशिक्षण, योग्य व्यासपीठ आणि सन्मान मिळाला, तरच महाराष्ट्राची लोककला पुन्हा अभिमानाने उभी राहील.  - बरखा आणि अप्-सरा जळगांवकर, लावणी कलावंत.डीजे लावणी प्रकारांवर बंदी घाला.पारंपरिक लावणी आणि तमाशा कलेचे संरक्षण तसेच संगीत बारी आणि डीजे लावणी कार्यक्रमातील अश्लील सादरीकरणांवरील नियंत्रणासाठी स्वतंत्र नियामक मंडळ स्थापन स्थापन करावे, या प्रमुख मागणीसह सर्वांनी एकमताने ठराव करून डीजे लावणी प्रकारावर शंभर टक्के बंदी घालण्यात यावी, अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे. तसेच, सादरीकरणांसाठी पूर्वपरवानगी आणि तपासणी यंत्रणा लागू करावी, नियमांचे उल्लंघन करणार्या कलाकार, आयोजक आणि संबंधितांवर कारवाई करावी, वारंवार नियमांचे उल्लंघन झाल्यास परवाना कायमस्वरूपी रद्द, अशा विविध मागण्याही करण्यात आल्या, याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले.



# ‘ती’कडून ‘तो’कडे जाणारा संवेदनशील पण धाडसी प्रवास

सध्या मराठी चित्रपटसृष्टीत खूप वेगवेगळे विषय हाताळलेले दिसतात. नातेसंबंधातील गुंतागुंत हा त्यापैकीच एक. बालपणापासून टॉमबॉयसारखी वावरणारी एक बाई स्वत:तील वेगळेपण ओळखून ‘पुरुष’ होण्याचा निर्णय घेते. ‘लिंगबदल’ हा काहीसा नाजूक, संवेदनशील; पण अत्यंत धाडसी असा विषय सध्या प्रदर्शित होत असलेल्या ‘बाप्या’ चित्रपटात पाहायला मिळतो. अन्या बोरकर (गिरीश कुलकर्णी) हा कोकणातील एक मच्छिमार, कोळी. बायको विशाखा (देविका दफ्तरदार), मुलगा संजू (आर्यन मेंघजी) आणि दोन छोट्या मुलींसह आनंदात राहात असतो. एके दिवशी त्याचा जिवलग मित्र शिंदे वकील (श्रीकांत यादव) त्याला एका जमीन व्यवहाराची माहिती देतो. त्यासाठी त्याची दहा वर्षांपूर्वी घटस्फोट घेऊन गेलेली पहिली बायको, शैलजा (राजश्री देशपांडे) हिच्या सह्या लागणार असतात. व्यवहार करण्यासाठी ते रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये भेटतात. त्यावेळी असे काही विलक्षण वास्तव समोर येते की, त्याच्या जीवनात अक्षरश: उलथापालथ घडते. त्याची बायको शैलजा ही डॉ. शैलेश म्हणून त्याच्यासमोर उभी असते.हे असे का घडले असते? यावर अन्याची काय प्रतिक्रिया असते? संजू आईला स्वीकारतो का? या सर्व प्रश्नांची उत्तरे पडद्यावरच पाहावी लागतील.

‘‘आपली यारी... गावावर भारी’’ या टॅगलाइनसह असलेल्या या चित्रपटाची कथा ‘शैलजा ते शैलेश’ साधी-सरळ नाही. लिंग बदलाच्या धाडसी प्रवासातून नाती, स्वीकार आणि ओळख यांचा गुंता मांडणारा, भावनिक आणि विचार करायला लावणारा असा हा चित्रपट आहे. नात्यांचा गोंधळ, ताणतणाव त्याचबरोबर मैत्री, प्रेम हे सर्वच सहजरीत्या प्रदर्शित करण्यात आले आहे. विषय जरी गंभीर असला तरी अधूनमधून प्रासंगिक विनोदांची पेरणी असल्याने हलक्या फुलक्या प्रकारे उलगडला जातो. यामध्ये दिग्दर्शक समीर तिवारींचे कौशल्य जाणवते. शैलजा आणि शैलेश या दोन्ही भूमिका साकारण्यासाठी राजश्री देशपांडेने भरपूर मेहनत घेतली आहे. दोन्ही भूमिकांमध्ये तिचा अभिनय जबरदस्त आहे. गिरीश कुलकर्णींचा ‘अन्या’ मनाला भावतो. प्रेम, मैत्री, तिरस्कार, संताप सर्वच भावना त्यांच्या मुद्राभिनयातून स्पष्ट प्रकट होतात. देविका दफ्तरदारने साधी, भाबडी आई उत्तम वठवली आहे. आर्यन मेंगजीने ‘संजू’च्या भूमिकेला योग्य न्याय दिला आहे. टीनएजर मुलाची मानसिकता, सोशल मीडियाचा वापर, सर्व गोष्टी समर्पक वाटतात. विशेष लक्षात राहते ती वर्षा दांदळे. आजीच्या छोट्याशा भूमिकेतही संवादांची अचूक फेक, विनोदाचे टायमिंग उल्लेखनीय आहे. पार्श्वसंगीत प्रभावी आहे. संपूर्ण चित्रपट कोकणच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर चित्रित झाला असल्याने सिनेमॅटोग्राफीही अफलातून आहे. कोकणातील व्यक्तींच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, त्यांच्या मनोभावना यांचीही या निमित्ताने ओळख होते. सामाजिक विषयावरील, वेगळी मांडणी असलेला हा अभिनयप्रधान चित्रपट जरूर पाहावा असा आहे.बाप्या दिग्दर्शक : समीर तिवारी कलाकार : राजश्री देशपांडे, गिरीश कुलकर्णी, देविका दफ्तरदार, श्रीकांत यादव, वर्षा दांदळे.-

**--कल्पना खरे**

# “राजा शिवाजी”ची विक्रमी घोडदौड! १७ व्या दिवशी तगडी कमाई



मुंबई : रितेश देशमुखचा ‘राजा शिवाजी’ हा मराठी चित्रपट बॉक्स ऑफिसवर एकामागोमाग एक विक्रम मोडत आता नवा इतिहास रचण्याच्या तयारीत आहे. ‘वेड’नंतर ‘बाईपण भारी देवा’ या सुपरहिट सिनेमालाही मागे टाकत ‘राजा शिवाजी’ आता ‘सैराट’ला जोरदार टक्कर देताना दिसत आहे.

१ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्याच दिवशी तब्बल ११.३५ कोटी रुपयांची कमाई करत मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठा ओपनर ठरण्याचा मान पटकावला. रिलीजच्या पहिल्या शनिवारी सिनेमाने १०.५५ कोटी रुपयांची कमाई केली, तर रविवारी तब्बल १२ कोटींचा गल्ला जमवत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. यासह ओपनिंग वीकेंडला सर्वाधिक कमाई करणारा मराठी चित्रपट म्हणूनही ‘राजा शिवाजी’ने विक्रम आपल्या नावावर केला.

चित्रपटाची भारतातील निव्वळ कमाई पहिल्याच आठवड्यात ५७.७० कोटी रुपयांवर पोहा-चली. विशेष म्हणजे पहिल्याच आठवड्यात ५० कोटींचा टप्पा पार करणारा हा पहिला मराठी चित्रपट ठरला आहे. त्यामुळे ‘राजा शिवाजी’ने बॉक्स ऑफिसवर नवा इतिहास घडवला.

दुसऱ्या आठवड्यातही या चित्रपटाची घोडदौड कायम राहिली. ७५.१० कोटी रुपयांच्या निव्वळ कमाईसह ‘राजा शिवाजी’ने ‘वेड’ चित्रपटाचा सर्वाधिक कमाईचा विक्रम मोडला. यानंतर सर्वाधिक कमाई करणाऱ्या मराठी चित्रपटांच्या यादीत हा सिनेमा तिसऱ्या स्थ-ानावर पोहोचला.


आता तिसऱ्या आठवड्यात ‘राजा शिवाजी’ने आणखी एक मोठा पराक्रम केला आहे. ‘बाईपण भारी देवा’ या सुपरहिट सिनेमालाही कमाईच्या बाबतीत मागे टाकत या चित्रपटाने सर्वाधिक कमाई करणाऱ्या मराठी चित्रपटांच्या यादीत दुसरे स्थान पटकावले आहे.

सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, तिसऱ्या रविवारी म्हणजेच १७ व्या दिवशी या चित्रपटाने तब्बल ३.०५ कोटी रुपयांची कमाई केली. यासह चित्रपटाची एकूण कमाई ८४.१५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

विकिपीडियावरील माहितीनुसार, ‘राजा शिवाजी’चे वर्ल्डवाइड ग्रॉस कलेक्शन १०४.९६ कोटी रुपये इतके झाले आहे. तर नेट कलेक्शन ८८.८५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. यामुळेच हा चित्रपट आता सर्वाधिक कमाई करणारा दुसरा मराठी चित्रपट ठरला आहे.

‘राजा शिवाजी’ने आतापर्यंत तब्बल ५ मोठे विक्रम आपल्या नावावर केले आहेत. पहिल्या दिवशी सर्वाधिक कमाई करणारा मराठी चित्रपट, पहिल्या वीकेंडला सर्वाधिक गल्ला जमवणारा चित्रपट, पहिल्याच आठवड्यात ५० कोटींचा टप्पा पार करणारा पहिला मराठी चित्रपट, तसेच ‘वेड’ आणि ‘बाईपण भारी देवा’चे रेकॉर्ड मोडत सर्वाधिक कमाई करणारा दुसरा मराठी चित्रपट असा हा विक्रमांचा सिलसिला सुरू आहे.विशेष म्हणजे, हिंदी चित्रपटांशी तुलना केली असता २०२६ मधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत ‘धुरंधर : द रिव्हेंज’ आणि ‘भूत बंगला’नंतर ‘राजा शिवाजी’ने तिसरे स्थान

# आम्ही वेगळं होण्याचा निर्णय घेतलाय; अखेर मौनी रॉयने घटस्फोटावर मोडलं मौन



मुंबई : गेल्या काही दिवसांपासून 'नागिन' फेम अभिनेत्री मौनी रॉय  आणि तिचा पती सूरज नांबियार  यांच्या वैवाहिक आयुष्याबाबत सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आलं होतं. एकमेकांना सोशल मीडियावर अनफॉलो करणं, एकत्रित फोटो हटवणं आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये एकत्र न दिसणं यामुळे त्यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चांना अधिक हवा मिळाली होती. अखेर या सर्व अफवांवर स्वतः मौनी रॉयनेच अधिकृत प्रतिक्रिया देत मोठा खुलासा केला आहे.मौनी आणि सूरज यांनी संयुक्त निवेदन जारी करत परस्पर संमतीने वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली आहे.

आम्ही दोघांनी खूप विचार करून आणि एकमेकांबद्दलचा आदर कायम ठेवत स्वतंत्र मार्ग निवडण्याचा निर्णय घेतला आहे, असं त्यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे. आयुष्यातील बदलते प्राधान्यक्रम, वैयक्तिक ध्येय आणि भावनिक परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं या कठीण काळात गोपनीयतेचा आदर राखण्याचं आवाहन करत मौनीने सोशल मीडियावर भावूक पोस्ट शेअर केली.

# ‘जीव’ चित्रपटाची प्रतिष्ठित फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड

पुणे : ‘पिफ’मध्ये पुरस्कार पटकावल्यानंतर थेट फ्रान्समधील प्रतिष्ठित ‘कान्स’ फिल्म फेस्टिवलसाठी अभिनेत्री दीक्षा उजागरे हीच्या ‘जीव - द क्रिएचर’ या चित्रपटाची निवड झाली आहे. फिल्म मार्केट विभागात हा चित्रपट दाखवला जाणार आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र चित्रपट, नाट्य आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी नुकतीच याची घोषणा केली. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी या

चित्रपटाचे अभिनंदन केले.रवींद्र जाधव लिखित-दिग्दर्शित ‘जीव - द क्रिएचर’ हा चित्रपट महाराष्ट्रातून लुप्त होत असलेल्या आदिवासी कोकणी समाजाची भाषा, लोकगीतं,




## पुण्याच्या दीक्षाची कान्सभरारी!

परंपारिक वाद्ये, चालीरीतींचा वेध घेतो. १२ ते २३ मे दरम्यान फ्रान्समध्ये कान्स चित्रपट महोत्सव पार पडणार आहे. या चित्रपटाच्या निवड प्रक्रियेत छाया कदम, अमोल परचुरे, तृप्ती भोईर, भाऊसाहेब कऱ्हाडे आणि विजय खोचीकर या तज्ज्ञांच्या पॅनेलचा सहभाग होता.

फर्ग्युसन कॉलेज अन् ललित कला केंद्रातून धडे

दीक्षा उजागरे ही उदयोन्मुख कलाकार असून मुख्य अभिनेत्री म्हणून 'जीव' हा तिचा पहिलाच पूर्ण लांबीचा मराठी चित्रपट आहे. यापूर्वी तिने काही लघुपट आणि टीव्ही मालिकांमधूनही कामे केली आहेत. दीक्षाचे महाविद्यालयीन शिक्षण हे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून झाले. याच ठिकाणी तिच्यावर नाट्यस्पर्धांमधून अभिनयाचे संस्कार झाले.

त्यानंतर तिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातून अभिनयात एमए केले. एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या आणि अभिनयाची कुठलीही पार्श्वभूमी नसताना अल्प-वधीतच दीक्षाने घेतलेल्या या 'कान्स'भरारीमुळे सर्वांचे लक्ष वेधले आहे. दीक्षा व्यक्तिरिक्त 'जीव' चित्रपटात बेबीताई सूर्यवंशी, किरण काकडे, बालकलाकार आदर्श जाधव, रवींद्र जाधव, शिवाजी शेवाळे, उषा निंबाळकर आदी कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत.

# काळ्या ब्लेझरमध्ये रुचिरा जाधवचा बोल्ड अंदाज; कॅप्शनचीही चर्चा



मुंबई : मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय आणि ग्लॅमरस अभिनेत्री म्हणून रुचिरा जाधव  हिचं नाव घेतलं जातं. आपल्या अभिनयासोबतच बोल्ड आणि स्टायलिश अंदाजामुळे रुचिरा नेहमीच चर्चेत असते. सोशल मीडियावर तिची मोठी फॅन फॉलोइंग असून, तिच्या प्रत्येक पोस्टला चाहत्यांकडून भरभरून प्रतिसाद मिळताना दिसतो.बोल्ड आणि ब्युटीफुल अशी ओळख असलेली रुचिरा जाधव हिला अनेक तरुणी तिच्या फॅशन सेन्सला फॉलो करताना दिसतात. पारंपरिक लूक असो किंवा वेस्टर्न स्टाइल, रुचिरा प्रत्येक अंदाजात चाहत्यांचं लक्ष वेधून घेते.रुचिरा जाधव  हिनं अनेक लोकप्रिय मराठी मालिकांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. विशेषतः ‘माझ्या नवऱ्याची बायको’ या मालिकेमुळे तिला मोठी लोकप्रियता मिळाली. या मालिकेतील तिच्या अभिनयाचं प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केलं होतं. त्यानंतर ‘तू ही रे, माझा मितवा’ या मालिकेत तिनं साकारलेली खलनायिकेची भूमिका देखील प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली होती. मालिकांसोबतच रुचिरानं काही मराठी चित्रपटांमध्येही काम केलं आहे. आता ती एका नव्या मराठी सिनेमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा आहे. मात्र, सध्या ती तिच्या आगामी प्रोजेक्टपेक्षा एका खास फोटोशूटमुळे जास्त चर्चेत आली आहे. नुकतंच रुचिरा जाधव   हिनं सोशल मीडियावर तिच्या नव्या फोटोशूटचे काही खास फोटो शेअर केले आहेत. या फोटोशूटमध्ये तिचा अतिशय ग्लॅमरस आणि बोल्ड अंदाज पाहायला मिळत आहे.

काळ्या रंगाचे शॉर्ट्स आणि ओव्हरसाइज ब्लेझरमध्ये केलेल्या

# रणबीर कपूर झाला अयोध्यावासी!

अयोध्या : रणबीर कपूर सध्या त्याच्या बहुचर्चित रामायण चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात तो प्रभू श्रीरामांची भूमिका साकारत असून, चित्रपटाच्या प्रदर्शनाची चाहते उत्सुकतेने वाट पाहत आहेत. हनुमान जयंतीच्या निमित्ताने निर्मात्यांनी चित्रपटातील रणबीर कपूरच्या प्रभू श्रीरामांच्या भूमिकेची खास झलक प्रदर्शित केली होती. या झलकनंतर चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे.

मात्र, आता रणबीर कपूर एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. चित्रपट रिलीज होण्याआधीच त्याने अयोध्येत मोठी गुंतवणूक करत तब्बल ३.३१ कोटी रुपयांची प्रॉपर्टी खर-ेदी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रणबीर कपूरने अयोध्येत सुमारे २,१३४ स्क्वेअर फूट जागा खरेदी केली आहे. ही प्रॉपर्टी राम मंदिरापासून अवघ्या २० मिनिटांच्या अंतरावर असलेल्या सरयू नदीकिनारी विकसित होत असलेल्या एका प्रीमियम प्रोजेक्टमध्ये असल्याचं सांगितलं जात आहे. या प्रोजेक्टमध्ये आलिशान घरं, आधुनिक क्लब हाऊस, लक्झरी सुविधा आणि नामांकित हॉटेल ब्रँडच्या सेवा देखील उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे या प्रकल्पाकडे गुंतवणूकदार आणि सेलिब्रिटींचं विशेष लक्ष लागलं आहे.

या प्रॉपर्टी खरेदीबाबत बोलताना रणबीर कपूरने अयोध्येबद्दलच्या आपल्या खास भावना व्यक्त केल्या. तो म्हणाला, माझा असा विश्वास आहे की अयोध्येनेच माझी निवड केली आणि मी फक्त त्या हाकेला प्रतिसाद दिला. अयोध्या ही आपल्या इतिहासात आणि संस्कृतीत खोलवर रुजलेली भूमी आहे. सरयूच्या या पवित्र भूमीने माझ्यासाठी एक माध्यम म्हणून काम केलं असून, त्यामुळे ही जागा माझ्या कुटुंबाशी कायमची जोडली जाईल.

रणबीर कपूरच्या या निर्णयाची सध्या सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू आहे. ङ्करामायणफ चित्रपटात प्रभू श्रीरामांची भूमिका साकारत असतानाच अयोध्येत प्रॉपर्टी खरेदी केल्यामुळे अनेक चाहत्यांनी त्याच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे.



# महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या लघुपटास प्रथम पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाने राज्यस्तरीय 'स्पंदन ललित कला २०२६' युवक महोत्सवात उल्लेखनीय यश संपादन करत लघुपट प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'निदान' या लघुपटाने प्रभावी कथा, उत्कृष्ट अभिनय आणि समाजमनाला भिडणाऱ्या आशयाच्या जोरावर परीक्षकांसह प्रेक्षकांचीही मने जिंकली.

पुणे येथील ढोले पाटील फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'स्पंदन ललित कला २०२६' युवक महोत्सवात राज्यभरातील विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध कला प्रकारांमध्ये स्पर्धा पार पडल्या. अत्यंत चुरशीच्या वातावरणात महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'निदान' या लघुपटाव्दारे 'षड्रिपू' या मानवी जीवनातील सहा दोषांवर आधारित प्रभावी संकल्पना मांडत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



मानवी मनातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षड्रिपूंचा व्यक्तीच्या आयुष्यावर होणारा परिणाम, मानसिक संघर्ष आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी चित्रण या लघुपटात करण्यात आले होते. आधुनिक जीवनशैलीत वाढत चाललेल्या मानसिक ताणतणावांवर आणि व्यक्तीच्या अंतर्मनातील संघर्षांवर भाष्य करणारा हा लघुपट आशयघन आणि विचारप्रवर्तक ठरला. प्रभावी कथानक, उत्कृष्ट अभिनय आणि भावनिक मांडणीमुळे प्रेक्षकांनी लघुपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या लघुपटाचे दिग्दर्शन आणि पटकथा लेखन अंतिम वर्षातील विद्यार्थी आफताब मशायक यांनी केले. प्रियंका महाजन आणि अंजली थोंबाळ यांनी संवादलेखनाची जबाबदारी सांभाळली. धम्मसंकेत सपकाळ आणि संकेत बनसोडे यांनी छायाचित्रण करत कथानकाला साजेशी दृश्यात्मक मांडणी केली, तर अबरार खान यांनी संपादनातून लघुपटाला प्रभावी गती दिली. विद्यार्थ्यांच्या अभिनयाबरोबरच पार्श्वसंगीत, तांत्रिक हाताळणी, दिग्दर्शन आणि एकूणच सादरीकरणाचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले.

या लघुपटात आफताब मशायक, साक्षी साखरे, सुप्रिया कुंभार, अंजली थोंबाळ, आदिती गंगावणे, अथर्व अनावडे, गणेश वाघमारे, पियुष बोरसे आणि प्राजक्ता शेप यांनी कलाकार म्हणून भूमिका साकारल्या. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना डॉ. आनंद रेड्डी व डॉ. श्रुती ताडमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थ्यांचा कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, डॉ. श्रुती ताडमारे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केल्याबद्दल डॉ. कराड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती नुकतीच गठीत करण्यात आली असून या समितीतील अध्यक्ष व सदस्यांनी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून समितीच्या माध्यमातून गोरगरीब माणसांना आधार देण्यासाठी काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती गठीत केली आहे. लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीवर नियुक्ती करून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून समिती अध्यक्ष बन्सी भिसे आणि सर्व सदस्यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष बन्सी भिसे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, उद्धव काळे, ॲड. मनोज कराड, दीपक वांगसकर, राजकिरण साठे, ॲड. धनराज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, शुभम खोसे, अशोक सावंत, बाळासाहेब कदम, पांडुरंग कदम, किशोर घुटे, संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य स्वाती घुटे, संतोष गायकवाड, सदाम रशीद शेख, रुपेश काळे, बाबासाहेब भिसे, सदाशिव गव्हाणे, अंकुश कुंभार, विनायक मगर, परमेश्वर पर्वते यांच्यासह अनेक जण होते.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत बी. फार्मसी अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, दि. १६ मे २०२६: दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे बी. फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दिनांक १६ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात भरभरून यश संपादन करावे, नवनवीन गोष्टी आत्मसात कराव्यात तसेच एक यशस्वी फार्मासिस्ट म्हणून समाजात आपली ओळख निर्माण करावी, असा प्रेरणादायी संदेश दिला.

यावेळी बी. फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. अंतिम वर्षातील विद्यार्थिनी अदिबा शेख व विद्यार्थी कृष्णा देशपांडे यांनी मनोगत व्यक्त करत महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन बी. फार्मसी तृतीय वर्षातील निकिता काळे, श्रीदत्त शेटकर, सुजाता भालके व श्रद्धा देशमुख यांनी केले. प्रा. सुषमा पांचाळ यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक म्हणून प्रा. अविनाश चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी प्रा. अरुण कोंडापुरे, प्रा. गणेश तोडकर, प्रा. प्रतीक चिंचोले, प्रा. ओम पाटील, प्रा. खालिद शेख, प्रा. मुस्कान पठाण यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## उष्णतेमुळे नागरिकांना त्रास

**लातूर/प्रतिनिधी :**उष्णतेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दिवसा कडक उन्हा मुळे तर रात्री घामामुळे आबाळ-वृद्धांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यात वीज सतत जात असून पंख्या अभावी रात्र काढणे अशक्य होत आहे.

# कोणतेही पिंपळाचे झाड तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी: आमदार सुहास बाबर

## एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु होऊन सांगली जिल्ह्यात हरित क्रांतीला प्रचंड प्रतिसाद

**सांगली/प्रतिनिधी :** सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे अवघ्या सांगली जिल्ह्यात या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्त्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं. दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी घट्ट नाळ जोडलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते होते. सांगली ग्रामीण भागातील टेंभू योजनेचे जनक असा त्यांचा सार्थ उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात त्यांचा राजकीय वारसा मिळालेल्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ७८१७८ इतके मताधिक्य घेतले तेव्हाच त्यांनी ठरवले की आमदारकीच्या काळात मताधिक्या एवढे वृक्ष मतदारसंघात लावावेत. याबाबत बोलताना आमदार सुहास बाबर म्हणाले की एका पिंपळाच्या झाडाच्या पुनर्वसनाच्या प्रेरणेतून आज मोठी हरित लोक चळवळ खानापूर आटपाडी परिसराच्या पर्यावरणात सकारात्मक बदल घडवू पाहत आहे.



समाज माध्यमांवर पिंपळाची गोष्ट प्रसारित केल्यानंतर त्याला मिळालेल्या तुफान प्रतिसादातून हजारो लोकं जोडली गेली आणि दररोज जोडली जात आहेत. लोकं स्वयंप्रेरणेने जागा, पाणी, झाडं, श्रमदान करण्यासाठी पुढे येत आहेत. ट्री आर्मी असं नामकरण लोकांनीच केलं असल्याचं आमदार बाबर म्हणाले. आपल्या मातोश्रींच्या श्राद्ध दिवशी ५३०० आंब्याची कलमे रुजवल्याची माहिती त्यांनी दिली. तर विटा नागरपालिकेच्या नगरसेवकाने या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून चार वर्षांची वाढलेली ५२ झाडं भेट दिली तसेच आळसंद ग्रामपंचायतीने ५०० झाडांचे रोपण केले आहे असे ते म्हणाले. सांगलीचे जिल्हा प्रशासन, वन विभाग यांच्या माध्यमातून एक एकर जागेत जपानी पद्धतीचा मियावकी जंगल विकसित करण्याचे निश्चित केल्याची माहिती त्यांनी दिली. गायरान जमिनीवर, रस्त्यालगत महाराष्ट्राच्या मातीत नैसर्गिकपणे उगवणारी झाडे रुजवण्याचा उपक्रम मतदारसंघात आता सुरु आहे. पूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यांवर ग्रीन टनेल वाहनचालकांना विशेषतः दुचाकीस्वारांना सावली आणि थंडावा देत पण महामार्ग आणि रस्ता रुंदीकरणामुळे हे ग्रीन टनेल नाहीसे झाले, त्याला पूर्ववत करण्याचे ध्येय ठेवल्याचे आमदार बाबर यांनी सांगितले. येत्या ५ जून रोजी होणाऱ्या वसुंधरा दिनानिमित्त अधिक प्रमाणात वड, पिंपळ, बहावा, करंज, चिंच अशा डेरेदार वृक्षांची लागवड सुरु आहे, त्यांच्या संगोपन आणि संवर्धनासाठी ट्री आर्मी कटिबद्ध असून जिल्ह्यातील विविध व्यक्ती, व्यापारी संघटना, संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. नोकरी धंद्यानिमित्त खानापूर आटपाडीपासून दूर राहणाऱ्या लोकांना पुन्हा एकदा आपल्या गावाशी नाळ जुळवायची असेल तर सहभागी व्हावे असे आवाहनही आमदार सुहास बाबर यांनी केले.

# जणगणनेत वीरशैव शब्द नको, लिंगायत महासंघाच्या बैठकीत निर्णय

**लातूर/प्रतिनिधी :**लिंगायत महासंघाच्या वतीने २०२६-२७ च्या होत असलेल्या जनगणनेत लिंगायत बांधवांनी काय करावे व काय करू नये यासाठी वीरशैव लिंगायत सांस्कृतिक भवन खंडोबा गल्ली लातूर येथे आज लिंगायत समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लिंगायत महासंघाचे प्रांतअध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार हे होते. या होत असलेल्या जनगणनेत धर्माची नोंद करत असताना वीरशैव शब्द नको असे ठरवण्यात आले. या बैठकीत राष्ट्रीय जनगणना २०२६ ची सुरुवात झाली असल्याचे सांगण्यात आले. या जनगणनेचा पहिला टप्पा स्व जनगणनेचा होता व तो पार पडला असून आता घरोघरी प्रगणक जाऊन घरगणना करणार आहेत व पुढच्या टप्प्यात धर्म आणि जात जनगणना होणार असून या जनगणनेच्या वेळी कॉलम नंबर सातमध्ये जे धर्माच्या इतर कॉलम मध्ये काय लिहावे यासाठी समाजात जागृती होण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. लिंगायत समाजाने जनगणनेमध्ये धर्म व जातीची कशी नोंद करावी किंवा काय लिहावे याबाबतीत तीन मतप्रवाह पडलेले आहेत.



त्यात एक धर्म वीरशैव लिंगायत लिहावे व जात वाणी, जंगम, तेली, माळी, कुंभार इत्यादी लिहावे तसेच दुसरा प्रवाह धर्म हिंदू व जात लिंगायत, वाणी, तेली, माळी, कुंभार इत्यादी प्रत्येकाच्या कागदपत्रावर जसे आहे असेच लिहावे तर तिसरा मतप्रवाह आहे लिंगायत धर्माला मान्यता मिळवायची असून धर्माच्या रकान्यात लिंगायत लिहावे जातीच्या रकान्यात आपापली जात लिहावी अशा या तीनही मतप्रवाहावर साधक-बाधक चर्चा करून सर्वांना मिळून एक प्रवाह सर्व संमतीने निर्माण व्हावा यासाठी लिंगायत महासंघाकडून प्रयत्न करणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

या बैठकीत वरील तीनही विचाराचे फायदे तोटे यावर खूप चर्चा झाली आणि सर्वानुमते धर्माच्या कॉलम मध्ये वीरशैव हा शब्द लिहू नये असे ठरले. या बैठकीत कागदपत्रावर नोंद असलेल्या धर्म हिंदू व जात लिंगायत असेच ठेवावे असेही अनेकांनी मते मांडली. त्यात त्यांचे म्हणणे असे होते धर्म लिंगायत झाल्यास जातही लिंगायत आहे धर्म आणि जातीचे नाव एकच कसे राहील म्हणून कागदपत्राची भविष्यकाळात अडचण आली तर काय करावे असेही प्रश्न उपस्थित करण्यात आले. जनगणनेमध्ये धर्म हिंदू लिहायचा की धर्माच्या जागी लिंगायत लिहायचे यावर अजून व्यापक चर्चा घडवून आणून एकमत करण्यासाठी जिल्हाभर व्यापक बैठका घेण्याचे ठरले. तसेच काही मान्यवरांनी जगद्गुरुंचेही मार्गदर्शन घ्यावे असे मत मांडले त्यानुसार जगद्गुरुनाही भेटण्याचा निर्णय लिंगायत महासंघाने घेतला आहे.

या बैठकीचे प्रास्ताविक लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश पटणे सर यांनी केले तर लिंगायत महासंघाचे चाकूर तालुका अध्यक्ष सुभाष शंकरे, लिंगायत महासंघाचे जिल्हा मार्गदर्शक जी जी ब्रह्मवाले गुरुजी, अखिल भारतीय वीरशैव महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवराज शेटकार, ॲड.मधुकर राजमाने,डॉ. मन्मथ भातांब्रे यांच्यासह अनेकांनी आपली मते मांडली. अध्यक्षीय समारोप लिंगायत महासंघाचे प्रांतअध्यक्ष प्रा. सुदर्शनराव बिरादार यांनी केला. या बैठकीला माणिकअप्पा मरळे, सिद्रामप्पा पोपडे, नागनाथअप्पा भुरके, विश्वनाथप्पा मिटकरी, शिवाप्पा कोरके, महादेव देवशेट्टे, लिंगायत महासंघाचे अहमदपूर तालुका संपर्कप्रमुख शिवकुमार होळदांडगे, लिंगायत महासंघाचे तालुका निलंगा तालुकाध्यक्ष चंद्रकांत डांगे, अशोक काडादी अजय पाटील, महासंघाचे जिल्हासरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, लिंगेश्वर बिराजदार, लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पाटील भडीकर, सुर्यकांतप्पा हत्ते, शिवकांत गंगापूरे, सविता खिंडे, शिवाप्पा कोरके यांच्यासह अनेक समाज बांधवांची यावेळी उपस्थिती होती. या बैठकीचे सूत्रसंचालन लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी भातमोडे सर यांनी केले तर आभार अहमदपुर तालुका संपर्क शिवकुमार होळदांडगे यांनी मानले.

# ट्रकच्या चाकाखाली आल्याने एकाचामृत्यू: लातूर-जहिराबाद महामार्गावरील घटना



**निलंगा/प्रतिनिधी :** ट्र लातूर - जहिराबाद महामार्गावरील निटूर येथे गुरुवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.१५) सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास निटूर गावातील मुख्य रस्त्यावर घडली. नागनाथ पांडुरंग मदाळे (वय ५०, रा. निटूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागनाथ पांडुरंग मदाळे (वय ५०, रा. निटूर) हे रस्त्याच्या कडेला थांबलेले असताना के.ए. ३२ सी ८१३० क्रमांकाच्या ट्रकचालकाने भरधाव वेगात व निष्काळजीपणे ट्रक चालवत रिव्हर्स घेतला. यावेळी ट्रकची जोरदार धडक नागनाथ मदाळे यांना बसली. धडकेनंतर ट्रक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात खताची पोती भरलेली असल्यामुळे धडक अधिक तीव्र झाली आणि या भीषण अपघातात मदाळे यांचा जागीच मृत्यू झाला.

घटना घडताच परिसरात मोठी खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर निटूर पोलीस चौकीचे पोलिस जमादार सुधीर शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह पुढील प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी मयताचे भाऊ रघुनाथ पांडुरंग मदाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून निटूर पोलीस चौकीत संबंधित ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक ए. डी. भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सोयाबीनचे भाव वाढले



**लातूर/प्रतिनिधी:** मागील आठवड्याच्या तुलनेत सोयाबीनच्या दरात प्रति क्विंटल साडेतीनशे रुपयांची वाढ झाली आहे. सध्या ९० टक्के शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लक नाही त्यामुळे या भाववाढीचा फायदा शेतकऱ्यांऐवजी व्यापारी व शासनाने आधारभूत केंद्रावर खरेदी केलेल्या सोयाबीनलाच होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

या वर्षी सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट झाल्याने बाजारात सोयाबीनचे भाव वाढतील अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. परंतु सोयाबीनचे भाव वर्षभरात चार हजारांच्या वर गेले नाहीत. ते २०२६ च्या मार्च पर्यंत कायम स्थिर होते. एप्रील - मे या दोन महिण्यात सोयाबीन प्रति क्विंटल दिड हजाराने वाढले. लहान व अल्पभुधारक शेतकऱ्यांनी मिळेल त्या भावाने सोयाबीनची विक्री केली आज अशा जवळपास ९० टक्के शेतकऱ्याकडे सोयाबीन उपलब्द नाही.

बाजारात सध्या सोयाबीन प्रति क्विंटल ६ हजार आठशे रुपये दराने विक्री होत आहे. परंतु त्याचा फायदा शेतकऱ्यांना होण्याऐवजी तो व्यापाऱ्यांना व शासनाने खरेदी केलेल्या सोयाबीनलाच अधिक होण्याची शक्यता आहे. सोयाबीन बरोबरच ज्वारीच्या भावातही क्विंटल मागे दिड ते दोन हजार रुपयांची वाढ झालेली आहे. तसेच तुर - ८११ , तुर - लाल , तूर - पिंक , तुर - पांढरी , चना जाकी , चना विजय ,मुग , राजमा ब्राझील , राजमा वरूण , ज्वारी व करडी या धान्याचे भाव शंभर ते तीनशे रुपये प्रति क्विंटलने वाढल्याचे चित्र आहे.

यावर्षी अतिवृष्टीने बहुतांश शेतकऱ्यांना फटका बसला. नदीकाठच्या शेकडो शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या गंजी पुरात वाहून गेल्या. २०२१ - २२ नंतर सोयाबीनच्या भावात वाढच झाली नव्हती ते चार - साडेचार हजारांवरच स्थिरावले होते. सध्या मात्र त्यात तीनशे ते साडेतीनशे रुपयांची वाढ झाली आहे. शासनाने सोयाबीनला प्रति क्विंटल ५ हजार ३२८ रुपये जाहिर केला होता. त्या मानाने बाजारात सोयाबीनला तेवढा भाव मिळाला नाही.

एका क्विंटलमागे दीड हजार रुपयांचा फटका शेतकऱ्यांना बसला. अशा शेतकऱ्यांना हमी भाव व बाजार भाव यातील फरकाची रक्कम देण्याची घोषणा सरकारने केली होती ती अद्याप पुर्ण झाली नाही. शेतीमालाचे उत्पादन कमी झाल्यावर त्यांचे भाव वाढतात असा शेतकऱ्यांचा समज असतो परंतु दरवर्षी त्याच्या उलट होतांना दिसत आहे. करडई हे तेलवर्गीय धान्य आहे. २०२५ मध्ये करडईला साडे नऊ हजार रुपये प्रति क्विंटल भाव होता त्यानंतर त्यात वाढ झाली नाही. एक वर्षात तीन साडेतीन हजाराची घसरण झाली आहे.

## रेणापूर येथे भरारी पथकाचा छापा

# रासायनिक खताचा अवैध साठा जप्त

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर पिंपळ फाटा येथील एका दुकानच्या गाळ्यात अनधिकृतरित्या एका कंपनीच्या रासायनिक खताचा साठा केल्याचे शनिवारी रात्री उघडकीस आले. कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने २ लाख ५५ हजार १५० रुपयांचे खत ताब्यात घेतले असून, याप्रकरणी तक्रार दाखल केली असून, रेणापूर पोलिस ठाण्यात रविवारी पहाटे २ वाजेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु होती.

खरीप हंगाम महिनाभरावर आला आहे. त्यामुळे रासायनिक खताचा अनाधिकृत साठा होऊ नये, तसेच बोगस खतांची विक्री होऊ नये म्हणून कृषी विभागाच्या पथकाकडून विशेष दक्षता घेतली जात आहे. दरम्यान, रेणापूर पिंपळ फाटा येथील एका दुकानच्या गाळ्यात अवैध विक्रीसाठी अनाधिकृतरित्या एका कंपनीच्या रासायनिक खताचे पोते



ठेवण्यात आले असल्याची माहिती कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे जिल्हास्तरीय पथकाचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी मिलिंद बीडबाग, सचिव तथा जिल्हा गुणनियंत्रण अधिकारी संतोष लाळगे, विभागीय गुण नियंत्रण निरीक्षक अशोक तिडके, सी.आय. टिळक, प्रदीप राऊत यांनी शनिवारी सायंकाळी अचानक छापा मारला. यावेळी कृषी विकास अधिकारी दीपक सुपेकर उपस्थित होते. त्यावेळी २०:२०:० ह्या खताच्या १८९ बॅग आढळल्या. हा साठा अनाधिकृत केल्याचे निष्पन्न झाले. कृषी विभागाने हा साठा ताब्यात घेत गाळा सिल केला आहे. त्याचबरोबर तपासणीसाठी काही नमुने घेतले आहेत.

**रासायनिक खताच्या १८९ बॅग...**

रेणापूर पिंपळ फाटा येथील एका दुकानच्या गाळ्यात रासायनिक खताच्या १८९ बॅग आढळल्या. त्याची किंमत २ लाख ५५ हजार १५० रुपयावर आहे. याबाबत रेणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया रविवारी पहाटे २ वाजेपर्यंत सुरु होती.

***पकडलेला साठा केला सील...***

*गोपनीय माहितीच्या आधारे रेणापूर पिंपळ फाटा येथे छापा मारला. यावेळी कुठलाही परवाना नसताना रासायनिक खताचा साठा केल्याचे आढळले. हा साठा सिल केला असून? तपासणीसाठी नमुने घेतले आहेत.*

**- मिलिंद बिडबाग,** अध्यक्ष, जिल्हा भरारी पथक, लातूर

# सामान्य नागरिकांचे प्रश्न तत्काळ सोडवा: तहसिलदार नरसिंग जाधव

**अजगर मजकुरी/नळेगाव:** शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत दि. १५ मे रोजी झरी बु.मंडळात आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तहसिलदार नरसिंग जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविण्यावर भर देण्यात आला. तालुक्यातील सुमारे हजारोहुन अधिक नागरिकांनी या अभियानात सहभाग घेत विविध योजनांचा लाभ मिळविला. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिर टप्पा क्रमांक-१ चाकूर तालुक्यातील मौ. झरी बु.येथे यशस्वीपणे पार पडला.

या समाधान शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला सदर कार्यक्रमास जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली नरसिंग जाधव तहसीलदार चाकूर,विद्या लोमटे एकात्मीक बाल विकास प्रकल्प अधिकारी, अफसाना मुल्ला-शेख पुरवठा निरीक्षक, यांच्या उपस्थिती मध्ये पार पडले.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचा लोकाभिमुख उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान हा जनतेच्या विविध विभागाशी संबंधित असलेल्या अडचणीची सोडवणूक तसेच त्याच मंडळामध्ये सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित राहून जनतेच्या समस्या जागेवरच सोडवण्यासाठी





अतिशय स्तुत्य उपक्रम राबवलेला आहे म्हणून जनतेने आपल्या समस्या तालुक्यापर्यंत किंवा जिल्हापर्यंत न जाता आज रोजी आपल्या समस्या आपल्याच गावांमध्ये सोडवुन करून आपली काम तत्पर करून घ्यावीत असे आवाहन या कार्यक्रमाप्रसंगी बोलत असताना नरसिंग जाधव तहसीलदार, चाकूर यांनी केले. या अभियानामध्ये १५ पेक्षा जास्त बाबी वरती आपण काम करीत आहोत जसे की, डिजिटल सातबारा वितरण, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, शिधापत्रिका दुरुस्ती, शिधापत्रिका मधील नाव वगळणे नाव समाविष्ट करणे, शेत रस्ता व पानंद रस्ता अतिक्रमण मुक्त करणे आरोग्य सेवा, नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच महिलांना बेबी केअर किट वितरण करण्यात आले, आधार कार्ड दुरुस्ती, श्रावण बाळ व संघ आयोग योजनांमधील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटप करण्यात आले, इत्यादी विविध योजनांचे मंजुरी पत्र तसेच प्रमाणपत्र वाटप, ई मोजणी, कमी जास्त पत्रक, प्रलंबित फेरफार अकृषिक एन ए परवानगी, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबत प्रकरणाचा निपटारा, सातबारा मधील चुकांची दुरुस्ती, घरांसाठी पट्टेवाटप इ मोजणी अर्ज, ग्रीस्टॅग आणि पीएम किसान नोंदणी, नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसाह्य योजनांचे लाभ मंजूर करणे, प्रमाणपत्र भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करणे. या आणि यासारखे असंख्य काम आपल्याला या अभियानाच्या माध्यमातून करावयाचे आहेत. तसेच २००२ च्या मतदार यादी सोबत बिएलओ च्या माध्यमातून गावागावांमध्ये मतदाराची मॅपिंग करण्याचं काम चालू आहे आपल्या बिएलओ ला सर्व माहिती देऊन आपली मतदार यादी मधली नावे कायम करून घ्यावीत अन्यथा मतदार यादी मधले नाव कमी होऊ शकते, तसेच मतदार यादीतील नाव कमी झाल्यास आपणास तालुका तहसील कार्यालयामध्ये विविध पुरावे देऊन सुनावणीच्या माध्यमातून नाव घेण्यात येतील, यामध्ये आपलाही वेळ जाईल तसेच योग्य पुरावे नसतील तर मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी समस्या निर्माण होईल. याकरिता बीएलओला सहकार्य करून आपली मतदार यादीतील नाव मॅपिंग करून कायम करून घ्या. असे प्रतिपादन यावेळी केले. यावेळी बोलताना तहसिलदार नरसिंग जाधव चाकुर यांनी महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या शासकीय कामासाठी कोणत्याही प्रकारची आडूनुक होऊ नये याकरिता त्या त्या गावांमध्ये हा उपक्रम राबवून त्या त्या गावातील जनतेच्या समस्या दूर करण्याचे काम याद्वारे होत आहे कोणतेही काम जनतेने सहकार्य केल्याशिवाय तसेच जनतेच्या सहभागाशिवाय पूर्ण होत नाही यासाठी आपण आपली काम या योजनेचा परिपूर्ण लाभ घेऊन करून घ्यावीत. परवाच महाराष्ट्र शासनाने शेतीशी संबंधित असलेले पानंद रस्ते नकाशावरील रस्ते या रस्त्याच्या संदर्भामध्ये अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला आहे की कोणत्याही शेतकऱ्याने रस्त्यावर अतिक्रमण किंवा रस्त्या अतिक्रमणमुक्त करताना अडवणूक केल्यास त्याचे ग्री स्टॅग चे कार्ड तसेच आधार कार्ड पाच वर्षासाठी रद्द करण्यात येईल असा कठोर परंतु शेतकरी हिताचा निर्णय घेतला आहे तरी कार्यवाहीस पात्र न होता आपल्या गावातील रस्ते मजबूत व पक्के करून घेऊन शेतकऱ्यानी आपल्या शेतीच्या रस्त्याचे मजबुतीकरण करून घ्यावे. प्रगती करण्यासाठी सहकार्य करावे. तहसील कार्यालया अंतर्गत असलेली जनतेची कोणतीही काम योग्य व कायदेशीर कागदपत्र दाखल केल्यास विना विलंब तात्काळ सेवेच्या माध्यमातून दिली जातील.

# लातूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात २ टँकर, ६३ विहिरींद्वारे पाणीपुरवठा

**लातूर/प्रतिनिधी:** सध्या जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये पाणी टंचाईची समस्या जाणवू लागली असून प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. १५ मे रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांपैकी जळकोट तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. याठिकाणी २ गावांमध्ये आणि एका वाडीवर पाणी पुरवण्यासाठी २ शासकीय टँकर मंजूर करण्यात आले आहेत. जळकोट तालुक्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या टँकरच्या दैनंदिन ४ फेऱ्या पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. यामध्ये प्रामुख्याने शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा आणि गव्हाण गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा मंजूर करण्यात आला आहे.

टँकरची आवश्यकता नसलेल्या मात्र पाणी टंचाई जाणवत असलेल्या इतर तालुक्यांमध्ये प्रशासनाने खाजगी विहिरी आणि विंधन विहिरींचे अधिग्रहण करून पाणी पुरवठ्याची सोय केली आहे. संपूर्ण लातूर जिल्ह्यात सध्या ६३ विहिरी व विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, यात अहमदपूर तालुक्यात २७, औसा तालुक्यात १५ विहिरी अथवा विंधन विहिरींचे आले आहेत. तसेच उदगीर तालुक्यात ११, चाकूर तालुक्यात ४, जळकोट तालुक्यात ४, लातूर तालुक्यात १ आणि रेणापूर तालुक्यात १ विहीर किंवा विंधन विहीर अधिग्रहित करून गावकऱ्यांना पाणी पुरवठा केला जात आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या वतीने या संपूर्ण टंचाई निवारण कामावर देखरेख ठेवली जात आहे.

## घर वापसी ..

कुठेहीनाही करमले
ठरविली घर वापसी
जशा बरसतात सरी
हळुचं श्रावण मासी

साहेबी थाटात गेलो
बनूनि राही चपराशी
अजून बाळगून आहे
सत्तेची स्वप्ना उराशी

वाढपी केले पंगतीत
ठेवले कायम उपाशी
संगीतखुर्ची स्पर्धेमधे
परिवार खेळे तुपाशी

कुठेही चोरी होऊ दे
माझी प्रथम तलाशी
कॅमेरे वटाळती डोळे
करी का मी ऐय्याशी

फोडतीलं कुणी घरटे
चाव्याठेवल्याउशाशी
डोकेदुखी ठरतोकसा
जागाराखीव पायाशी

कंटाळा आला भलता
किती करी मखलाशी
बोटीला पडताच छिंद्रे
जिम्मेदार का खलाशी

बदलत नाही सत्य खरे
सत्ताकेंद्र असे विनाशी
निष्ठा खरी ती कुणाशी
एकदा ठरवावे मनाशी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# लातूर पोलिसांचे 'ऑलआऊट' व 'कोंबिंग ऑपरेशन'

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी लातूर पोलीस दलाच्या वतीने दि. १६ ते १७ मे २०२६ च्या मध्यरात्री अचानकपणे जिल्हाभरात 'ऑलआऊट' व 'कोंबिंग ऑपरेशन' राबविण्यात आले.

पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या आदेशान्वये तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. सदर मोहिमेत लातूर जिल्हा पोलीस दलातील एकूण ३३ पोलीस अधिकारी , १४५ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

या ऑपरेशनदरम्यान पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांच्या घरांवर अचानक भेट देऊन त्यांच्या हालचालींची पडताळणी करण्यात आली. ते सध्या कुठे आहेत, कोणत्या प्रकारचा व्यवसाय करतात, त्यांच्या वर्तनात काही संशयास्पद बदल आहे का याबाबत सखोल चौकशी करण्यात आली. विशेषतः मालमत्तेविषयक गुन्हे करण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींवर लक्ष केंद्रीत करून त्यांना समज

**०४ जणांवर शस्त्र अधि. कायद्यान्वये कारवाई ; ०५ जणांवर प्रतिबंधात्मक गुन्हे ;३५ सराईत गुन्हेगारांची तपासणी**



देण्यात आली, ज्यामुळे संभाव्य गुन्हे रोखण्यास मोठी मदत होणार आहे.

या मोहिमेदरम्यान ४ जणांवर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांच्या ताब्यातील अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने शस्त्रे बाळगणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर भूमिका देण्यात आली आहे.

मालमत्तेविषयक गुन्हे करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या ५ व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२(क) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यास मदत होणार आहे.

ऑपरेशनअंतर्गत ३५ रेकॉर्डवरील घरफोडी व इतर गुन्ह्यांतील सराईत आरोपींच्या राहत्या घरी भेट देऊन त्यांच्या हालचालींची माहिती घेण्यात आली. तसेच त्यांना भविष्यात कोणतेही समाजविघातक कृत्य न करण्याबाबत समज देण्यात आली.

११७ लॉजेस व हॉटेल्सची तपासणी करण्यात आली असून ३० संवेदनशील (मर्मस्थळ) ठिकाणांना भेटी देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात विविध ३३ ठिकाणी नाकाबंदी करून ४२३ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.तसेच मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या ७ वाहनचालका विरुद्ध खटले दाखल करण्यात आले आहेत.

लातूर पोलिसांनी राबविलेल्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये स्पष्ट संदेश गेला असून, कायदा व सुव्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. अशा प्रकारच्या 'ऑलआऊट' व 'कोंबिंग ऑपरेशन' पुढेही सातत्याने राबवून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येणार असल्याचे लातूर पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# लातूर जिल्हा साहित्य भारती शाखेची कार्यकारिणी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी:** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या लातूर जिल्हा शाखेची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. नुकत्याच झालेल्या बैठकीत सन २०२६ -२७ या कालावधीसाठी सर्वानुमते ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये ❊जिल्हाध्यक्षपदी इंजि. शैलजा कारंडे, कार्याध्यक्षपदी प्रो.डॉ. रामचंद्र पस्तापुरे, उपाध्यक्षपदी डॉ. नयन राजमाने यांची निवड



करण्यात आली.❊ संघटन मंत्री प्रा. डॉ. बालाजी भंडारे, सहमंत्री - श्रीमती उषा भोसले, कोषाध्यक्ष डॉ. प्रणिता चाकूरकर, कार्यालय प्रमुख श्री उमेश सेलुकर, लोकसाहित्य कार्य प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, बालसाहित्य कार्य वृषाली पाटील, युवा साहित्यिक प्रतिनिधी म्हणून देवांश बालाजी पाचंगे, प्रचार व समाज माध्यम प्रमुख म्हणून डॉ. रामशेट्टी शेटकार यांची निवड करण्यात आली. महिला साहित्यिक प्रमुखपदी अश्विनी निवर्गी यांची निवड केली आहे. मार्गदर्शक म्हणून मा. प्रवीणजी सरदेशमुख व प्रा.डॉ. सुनिता सांगोले. या निवडीबद्दल साहित्य भारतीचे प्रांत महामंत्री युवराज नळे, प्रांताचे नितीन केळकर, शशिकांत घासकडबी, प्राचार्य संजीव गीरासे, डॉ. सर्जेराव जिगे, उमेशजी काळे, डॉ. रविंद्र बेंम्बरे, डॉ. नरेंद्रजी पाठक आदींसह साहित्य भारती परिवाराच्या वतीने नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६